दशकपूर्ती

# ईशान्य वार्ता

वर्ष ७, अंक ८, ऑगस्ट २०१९, मूल्य ₹ ३०/-
Ishanya Varta ₹ 30/-



सुवर्णकन्या
## हीमा दास

## ट्रेक विसापूर


पितांबरी®
हेल्थकेअर डिव्हिजन
क्युअरऑनचा फिरता हात,
वेदना सरती क्षणात!
क्युअरऑन
प्लस
वेदनाशामक तेल
100%
आयुर्वेदिक
कुचला आणि एरंडमूळ
यांच्या गुणांसह!
CureOn
Plus
Pain Relief Oil
Enriched with Kuchala & Erandmool
More Warming Quick Healing
३०, ६०, १०० आणि २०० मिली. मध्ये उपलब्ध.
Pitambari Products Pvt. Ltd.
Thane: 022-67035555, CRM No.: 022-6703 5564, 5699, CIN: U24239MH1989PTC051314
Toll Free: 180030701044, Now Shop Online : www.pitambari.com / shop & www.amazon.in

# ईशान्य वार्ता

वेध ईशान्येचा - वेध परिवर्तनाचा RNI Reg. No. MAHMAR/2012/45108

Email - friendsofne@gmail.com

वर्गणी दर - वार्षिक रु. ३००/-

द्वैवार्षिक रु. ५००/-

त्रैवार्षिक रु. ८००/-


## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| संवाद | .... | ०४ |
| संपादकीय | .... | ०७ |
| ते देखे रवी | सुधीर जोगळेकर | ०९ |
| मी "तो" नव्हेच | अनुवादित | ११ |
| मुष्टीयुध्द प्रविण - अंजु देवी | प्रतिनिधी | १३ |
| चेरापुंजी : मेघालयाचे वैभव | मनिषा कुलकर्णी | १५ |
| आसामची शान हिमादास | संकलित | १७ |
| कबाडकष्टांच्या मुशितच खेळाडू तयार होतात | विवेक पाटील | १९ |
| ईशान्य भारतातच जन्मला होता एटीएमचा जनक | प्रवीण कारखानीस | २० |
| नागा महिलांचा संघर्ष | प्रतिनिधी | २२ |
| इसरो : साधी माणसं, अफाट कर्तुत्व | सारंग लेले | २४ |
| पॅड वुमन - डॉ. प्रतिभा आठवले | डॉ. स्वाती गाडगीळ | २६ |
| नागालँडचे मित्र - मा. श्री. पद्मनाभ आचार्य | पुरुषोत्तम रानडे | ३० |



**संपादक**
पुरूषोत्तम रानडे
९९६९०३८७५९
९९६९१४९७७१

**पत्रव्यवहार**
१३, कृष्ण कुटीर, आयरे रोड,
डोंबिवली (पूर्व) ४२१२०१. जि. ठाणे.

**प्रकाशक**
जयवंत कोंडविलकर
९६१९७२०२१२
९ जयगायत्री, गोपाळनगर, रस्ता क्रं १,
डोंबिवली (पूर्व) ४२१२०१.

**समन्वयक**
संजय काठे : ९९६९००९२५५

**मुखपृष्ठावरील छायाचित्र**
पुणे व चिंचवड वसतीगृहातील विद्यार्थ्यांचा विसापूर ट्रेक

**मुखपृष्ठ**
रवि थेटे : ९८५०९३८०८१



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही. त्याचप्रमाणे या अंकातील लेखकांच्या विचारांशी संपादक वा प्रकाशक हे ही सहमत असतीलच असे नाही.

संवाद

# हे वार्ता व्रत असंच सदैव चालू रहावं

ईशान्य वार्ता हे एक सामाजिक, साहित्यिक आणि मराठी भाषेमधील दर्जेदार मासिक आहे. ऐतिहासिक, भौगोलिक, सांस्कृतिक आणि राजकीय अशी विविध प्रकारची माहिती देणारा परिपूर्ण अंक आहे. ईशान्येतील राज्यांबद्दल जिव्हाळ्याचा पूल निर्माण करणारा एक जिवलग मित्र बनून राहिला आहे. या "शब्द मित्राची" मी नेहमीच खूप उत्सुकतेने वाट पहात असते.

सध्याच्या डिजिटल मिडियाच्या काळात आणि त्याच्या प्रभावामुळे प्रिंटि मिडिया मागे तर पडणार नाहीना? असा प्रश्न पडत असताना सर्वांगसुंदर, विविधरंगी अशा ईशान्य वार्ताच्या संवादाची स्नेह सरिता अतिशय कष्टाने आणि काळजीपूर्वक वाहती ठेवणं अभिनंदनास्पद आहे. अर्थात या कार्यात, ईशान्येतील राज्यात अथक काम करणारे कार्यकर्ते, बातमीदार, लेखक, पर्यटक आणि मुख्य म्हणजे संपादक या सर्वांचा निश्चितच महत्त्वाचा वाटा आहे. ईशान्येतील राज्यांमधील घडामोडींचं महत्त्व, तत्त्व आणि सत्त्व लक्षात येण्यासाठी चालवलेले हे "वार्ता व्रत" सदैव चालू रहावं अशी इच्छा! आणि ईश्वचरणी मन:पूर्वक प्रार्थना!!

**- डॉ. प्रतिभा आठवले, अहमदाबाद**
**९४२६३६७४७२**

---

# ईशान्यवार्ताचे अल्पकाळातील उल्लेखनीय यश

ईशान्य वार्ता मासिक यंदा दशकपूर्ती साजरी करत आहे याचा निश्चितच आनंद वाटतो. संपादक पुरुषोत्तम रानडे यांची अपार मेहनत आणि त्यांच्या या कठीण कार्यात, जयवंत कोंडविलकर, संजय काठे यांनी त्यांना सातत्याने दिलेली साथ, यामुळेच हे शक्य झाले आहे यात शंकाच नाही. कोंडविलकर यांनी तर अगदी बालपणापासूनची अनेक वर्षे ईशान्य भारतातच व्यतीत केली असल्याने, तिथल्या जनतेच्या व्यथांची, आशा-आकांक्षांची, गुणावगुणांची आणि विशेष करुन त्या जनतेच्या अफाट कर्तृत्वशक्तीचीही त्यांना उत्तम जाण आहे आणि म्हणूनच तिथल्या जनतेबद्दल त्यांना विशेष आस्था आहे. पुरुषोत्तम रानडे हे महानगर टेलिफोन निगम मधून स्वयंनिवृत्त घेऊन, "विवेक" साप्ताहिकात पत्रकारितेचा अनुभव घेतलेले स्वतंत्र विचारांचे , साक्षेपी संपादक आहेत. त्याचप्रमाणे श्री. संजय काठे हे ही महानगर टेलिफोन निगम मधून स्वयं निवृत्ती घेऊन अंकाची धुरा समर्थपणे वहात आहेत.

"ईशान्य भारत" या केवळ एकाच विषयाला पूर्णत: वाहून घेतलेले संपादक, प्रकाशक आणि समन्वयक यांचा असा "समसमा संयोग" क्वचितच कुठे झालेला आढळत असेल. ईशान्य वार्ता मासिक आजमितीस ज्या प्रकारे, ईशान्येकडील सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक, राजकीय आणि क्रीडाविश्वातल्या घटनांचा अचूक वेध घेत उत्तम दर्जाच्या महत्त्वपूर्ण मजकूरासह अतिशय आकर्षक स्वरुपात, नियमितपणे वाचकांसमोर येत आहे त्याचे गमक हेच आहे असे मला प्रामाणिकपणे वाटते. केवळ या एकाच मासिकाने गेल्या दहा वर्षांच्या अल्पकाळात ईशान्येकडील राज्यांशी जशी आणि जितकी ओळख सर्वदूर पसरलेल्या हजारो मराठी वाचकांना करुन दिली आहे, तशी आणि तितकी ओळख आजवर कोणत्याही नियतकालिकाने कधीच करुन दिलेली नाही. दशकपूर्ती निमित्ताने ईशान्य वार्ताचे मनापासून अभीष्टचिंतन!

**- प्रविण कारखानीस, लंडन**

# ईशान्येतील सांस्कृतिक जगाचे प्रतिबिंब उमटावे

नियतकालिक मग ते दैनिक असो, मासिक असो की साप्ताहिक, ते सातत्याने चालवणं कठीणच असतं. पैशापासून मनुष्यबळापर्यंत कोणतीही कारणं असू शकतात. तरीही नियतकालिकं निघतच असतात, त्याचं मुख्य कारण झपाटलेपणा!

अशापैकी एक मासिक आहे "ईशान्य वार्ता!". नावातूनच हे स्पष्ट होते की हा विषय अजूनही आपल्याला फारसा जवळचा वाटत नाही. ही उदासिनता, हा अंधार दूर करण्याचं काम ईशान्य वार्ता मासिक करत आहे. त्याला आता १० वर्षे पूर्ण होत आहेत. याचाच अर्थ आता हे मासिक छान रुजलं आहे. याचे श्रेय संपादक श्री पुरुषोत्तम रानडे आणि त्यांनी गोळा केलेली लेखकांची, प्रतिनिधींची टीम, कार्यकर्ते यांनाच जातं. या निमित्ताने काही गोष्टींकडे लक्ष वेधावेसे वाटते. केवळ बातम्या किंवा अनुवादित लेख यांवर भर न देता अंकामध्ये ईशान्येतील लेखक, त्यांचे साहित्य , सांस्कृतिक जग, तेथील पुस्तकं या संबंधातील लेखन मिळाले तर पहावे. मला ठाऊक आहे हे की हे काम अवघड आहे पण अशक्य मात्र नाही. संबंधित मंडळीशी सातत्याने संपर्क साधल्यास ते साध्य होऊ शकेल. आंतरभारतीचे कार्य जिथे कुठे चालू असेल त्यांच्याशी देखील संपर्क साधता येईल. या अपेक्षा करण्यामागे एकच हेतू आहे, की आता ईशान्य वार्ता मासिक रुजलेले तर आहेच त्याचा अधिक विस्तार व्हावा. माझ्या परीने मी देखील शक्य ते सहकार्य करीनच. ईशान्य वार्ता आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना पुढील दमदार वाटचालीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा!

- रविप्रकाश कुलकर्णी (पत्रकार), डोंबिवली

## ईशान्य वार्ता दशकपूर्ती

१५ ऑगस्ट २००९ रोजी काही मोजक्या मित्रांसह सुरु झालेली ही ईशान्येची सफर १० वर्षे सुरु आहे. यापुढेही सुरुच राहणार आहे. हा प्रवास खडतर होता. तरी तो सोपा झाला तो अनेक मित्र, सहकारी, कार्यकर्ते, लेखक, प्रतिनिधी यांच्यामुळे. आणि मा. आबासाहेब पटवारी यांच्या कुशल मार्गदर्शनामुळे. या दहा वर्षात फ्रेंडस ऑफ नॉर्थईस्टची संख्या उत्तरोत्तर वाढतच गेली. आणि यापुढे तर हा काफिला अधिकच वाढत जाणार आहे, अशी स्पष्ट चिन्हे दिसत आहेत.

मळलेल्या वाटेने जायचा मोह सोडायचा, स्वत:ची वेगळी वाट शोधत पुढे जायचे असा निश्चयच केलेला असल्याने; या वाटेवर चालणे सुखाचे नसणार याची कल्पना होतीच. परंतु श्रध्देय कै. भैय्याजी काणे हे आमचे आदर्श असल्याने सर्व प्रकारच्या अडचणींवर मात करीत मैत्र भावनेने पुढे जात राहिले, तर यश निश्चित मिळेल हा ध्यास आणि विश्वास होता.

या पुढील प्रवास पूर्वीइतका खडतर राहणार नसला, तरी अधिक आव्हानात्मक असेल याची आम्हाला जाणीव आहे. या आव्हानांवर मात करीत पुढच्या प्रवासाला निघताना आपणा सर्वांची साथ-सोबत हवी आहे. ती मिळेल या खात्रीने पुढचे पाऊल टाकीत आहोत. सहकार्य आणि आशीर्वाद असावेत ही विनंती.

| जयवंत कोंडविलकर | संजय काठे | पुरुषोत्तम रानडे |
|---|---|---|
| प्रकाशक | समन्वयक | संपादक |

# ‘मिशन मणिपूर’ पुस्तकाचे रत्नागिरी आकाशवाणी केंद्रावर अभिवाचन

भैय्याजीं काणे यांचे कार्य म्हणजे देशाची पश्चिम (राजापूर), पूर्वेला म्हणजे मणिपूरला जोडण्याचा जणू सेतूच! या कार्यात अगदी लहान वयात श्री. जयवंत कोंडवीलकर जोडले गेले. या त्यांच्या कार्याचा वृत्तांत श्री. पुरुषोत्तम रानडे यांनी शब्दांकन केलेल्या **अश्रू ईशान्येचे - मिशन मणिपूर** या पुस्तकात मांडण्यात आलेला आहे. लोकांसाठी काम करतांना लोकांमध्ये मिसळून एकरुप होऊन काम करण्यावर भैय्याजींचा भर होता. हे अतिशय परिणामकारकपणे ह्या पुस्तकात मांडलं गेलं आहे.

हे कार्य सर्वसामान्य नागरिकांपर्यंत परिणामकारकपणे पोहोचावं यासाठी रत्नागिरी आकशवाणी केंद्रावरुन या पुस्तकाचे अभिवाचन आकाशवाणीवरील अधिकारी श्री. श्रीनिवास जरंडीकर यांच्या पुढाकाराने तसेच केंद्रातील तांत्रिक विभागातील कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने दिनांक ४ जून २०१९ पासून सुरु करण्यात आलेलं आहे. रत्नागिरीच्या कलाक्षेत्रातील अनेक जणांनी या कार्यक्रमाच्या निर्मितीमध्ये कोणतेही मानधन न घेता सहभाग नोंदवला आहे. कार्यक्रमाचं शीर्षकगीत देवगड येथील प्रतिभावान कवी श्री. प्रमोद जोशी यांच्या लेखणीतून परिणामकारकरित्या उतरलं आहे. त्याला स्वरांचा साज श्री. अवधूत बाम यांनी चढवला आहे. त्यांना श्री. उदय गोखले व हेरंब जोगळेकर यांनी उत्तम साद दिली आहे. ध्वनीमुद्रणाचं महत्त्वाचं काम श्री. उदयराज सावंत व राजू किल्लेदार यांनी पार पाडलं आहे.

या सर्वांच्या सहकार्यामुळेच हे अभिवाचन रत्नागिरी आकाशवाणीवर दर मंगळवारी सकाळी ८.४५ वाजता सादर होत असते. प्रत्येक व्यक्तीरेखेला वेगळा आवाज दिला असल्याने हे अभिवाचन नाट्यमय झाले आहे व लोकांच्या पसंतीसही उतरले आहे. अशाप्रकारे भैय्याजी व जयंवत कोंडविलकर यांच्या कार्यकर्तृत्वाची ओळख लोकांना करुन देण्यात आम्ही रत्नागिरीकरांनी खारीचा वाटा उचलला आहे. या अभिवाचनाचा शेवटचा भाग दिनांक १७ सप्टेंबर रोजी प्रसारीत होण्याची शक्यता आहे.

**- संजय गणपुले रत्नागिरी, ९१४५५७७०४४**

## आर्थिक मदतीचे हात

या कार्यक्रमासाठी आवश्यक आर्थिक सहाय्य आसपासच्या परिचितांनी, मित्रांनी आवर्जून केलं. त्यात कॅप्टन दिलीप भाटकर, आशाताई पाटणे, अॅड. कल्पलता भिडे, प्रा. कल्पना आठले, अॅड. योगेश खाडीलकर, प्रा. अतुल पित्रे, प्रशांत नाचणकर (मुंबई), स्मिता भिडे (सातारा), रविंद्र खंडकर (चिपळूण) त्याचप्रमाणे सुहास विद्वांस, उज्ज्वला विद्वांस, विनित घाणेकर, मिलिंद टिकेकर, उदय गोखले या सर्वांचा सहभाग विशेष उल्लेखनीय.

ईशान्य वार्ता
वेध ईशान्येचा - वेध परिवर्तनाचा

*संपादकीय......*

# आसाममध्ये "मिया पोएट्री"चं वादळ घोंगावतंय

I am Miya ; My serial number in NRC
is 200543
I have two childrens
another is coming next summer
will you hate him?
as you hate me!

ही आहे सध्या मिया पोएट्रीमधे गणली जाणारी आणि गाजणारी "मिया पोएम" म्हणजे मिया कविता! आसाममधील बांग्लाभाषी मुसलमानांची व्यथा व्यक्त करणारी ही एक कविता. आपल्याकडेही दलितांची व्यथा व्यक्त करणारा "विद्रोही कविता" हा काव्यप्रकार जन्माला आला. आता हाच विद्रोही कवितेचा मार्ग आसाममधील बांग्लादेशी मुस्लीमांनी "मिया पोएट्री" नांवाने रुढ केला आहे.

मात्र या कवितेतील आशय आणि त्यांचा उद्देश पहाता, आपल्याकडील विद्रोही कवितेशी त्यांची तुलना करणे पूर्णपणे चुकीचे ठरेल. विद्रोही कवितांमुळे दलितांच्या प्रश्नांकडे सहानुभूतीने बघणारा एक वर्ग आपल्याकडे तयार झाला. परिणामी दलीत चळवळ काही प्रमाणात पुढे जायला या कविता उपयुक्त ठरल्या असे म्हणता येईल. उलट या मिया पोएम दोन समाजात संघर्षाची ठिणगी पाडायला कारणीभूत ठरतील काय अशी शंका येते.

या काव्य प्रकाराच्या नांवातच "मिया" असल्याने त्यामागचा आशय आणि उद्देश स्पष्ट आहे. एनआरसी (नॅशनल रजिस्टर ऑफ सिटीझन्स - राष्ट्रीय नागरिकता नोंद) च्या अंतर्गत राष्ट्रीयता निश्चित करण्यासाठी जी पडताळणी सुरु आहे त्याचा आम्हाला कसा मानसिक त्रास होतोय असा आशय व्यक्त करणाऱ्या या कविता! १० कवींनी २०१६ पासून हा काव्यप्रकार जन्माला घातला. "मिया" म्हणजे एक आदरार्थी संबोधन. पण हाच शब्द आसाममधे बांग्लादेशी घुसखोरांसाठी वापरला जातोय. हा शब्द वापरुन असमिया समाज आमच्याकडे तुच्छतेने पहातोय, आमचा अपमान, पाणउतारा करतोय. घुसखोर म्हणून सरसकट आमच्याकडे संशयाने पाहिलं जातंय या भूमिकेतून हा विद्रोही कवितांचा सिलसिला सुरु झाला.

सोशल मिडियाच्या माध्यमातून या कविता आसाममध्ये सर्वत्र पोहोचवल्या जातायत. घुसखोरांसाठी असलेली शिबिरे म्हणजे जणू काही छळछावण्या असा अपप्रचार होतोय. मुस्लीम बुध्दीजीवी आणि त्यांना पाठिंबा देणारे आपल्याकडील अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते यांची एक लॉबीच आसाममधे सक्रीय झाली आहे.

साहजिकच, यामुळे आसामी नागरिकांत एकच खळबळ माजली आहे. "या कविता धार्मिक द्वेष पसरविणाऱ्या समाजात फूट पाडणाऱ्या, लोकांना धार्मिक चिथावणी देणाऱ्या आहेत. सबब या कवितांवर बंदी घातली जावी" अशा तक्रारी पोलिसांकडे दाखल करण्यात आल्या. हे झाल्यानंतर आपल्याकडे जे होतं ते तिकडेही झालं. या

कवितांवर बंदी म्हणजे लोकशाही आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी, अशी भूमिका घेऊन सुमारे दोनशे बुध्दीवंत पत्रकार, लेखक, चित्रपट अभिनेते या अन्याच्या विरोधात एकत्र आले. आणि त्यांनी बंदीचा एकमुखी निषेध केला.



वरवर या कविता साध्या वाटल्या तरी त्यातला आशय आणि "टायमिंग" बघता आणि त्यांचा ज्या प्रकारे वापर केला जातोय ते बघता या कवितांच्या आडून **एनआरसी** प्रक्रियेलाच एकप्रकारे आव्हान देऊन ही प्रक्रियाच कशी अन्यायकारक आहे हे दाखविण्यासाठी रचलेले हे एक षडयंत्र आहे, असं म्हणावं लागतं. तुम्ही आम्हाला "मिया" म्हणताना ऽऽ ! मग आहोच आम्ही मिया (आमचं कोण काय वाकडं करतोय तेच बघतो!) असा आक्रमक जहरी प्रचार या कवितांच्या माध्यमातून असममधील मुस्लीमांच्यात केला जातोय. आणि म्हणूनच या कवितांच्या विरोधात फिर्यादी दाखल झाल्या आहेत. मात्र अशी बंदी घालून सध्याच्या सोशल मिडियाच्या काळात तरी काही साध्य होत नसतं हे ही तितकंच खरं.

या घटनांची दखल घ्यावी लागतेय ती नागरिकत्व नोंदणी म्हणजे जणू काही आसाममधील मुस्लीमांवर अन्याय अशा प्रकारे जे वातावरण तापवलं जातंय त्यामुळे. आसाममधे अवैधरित्या घुसलेल्या घुसखोरांची ओळख पटवून त्यांची भारताबाहेर रवानगी करणं ही मूळात आसाम गणपरिषदेची मागणी. राजीव गांधी पंतप्रधान असतानाच्या काळात (१९८५) जो आसाम करार झाला त्याच्या अनुषंगाने आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने आणि देखरेखीखाली एनआरसीचं काम सुरु आहे. राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आणि बांगलादेशी मुस्लीमांच्या एकगठ्ठा मतांवर डोळा ठेवून नागरिकत्व नोंदणीचं काम अनेक वर्षे रेंगाळलं ते रेंगाळलंच. केंद्रात नवीन सरकार सत्तेवर आल्यावर मात्र या सरकारने या प्रक्रियेला चालना दिली. मूळच्या असामिया नागरिकांवर कोणताही अन्याय होवू नये या दृष्टीकोनातून पडताळणीसाठी केंद्रशासनाने सर्वोच्च न्यायालयाकडे अवधी मागून घेतला आणि न्यायालयाने ही आता ३१ जुलै ऐवजी ३१ ऑगस्ट रोजी अंतीम अहवाल जाहीर करण्याची सूट दिली आहे.

हा अहवाल उद्या जाहिर झाला तरी घुसखोर म्हणून शाबित झालेल्यांवर पुढील कारवाई कितपत होईल? बांग्लादेश या नागरिकांना परत घ्यायला तयार होईल काय? हे प्रश्न आजतरी अनुत्तरीतच आहेत. पण याचा अर्थ असाही नव्हे की नागरिकत्व शाबीत करण्यासाठी आम्हाला पुरावे द्यावे लागतायत, वारंवार खेटे घालावे लागतायत, आम्हांला मानसिक त्रास दिला जातोय असा कांगावा करीत वातावरण तापवण्याचा प्रकार या "मिया पोअेम"च्या माध्यमातून घडावा.

आधिच हा विषय संवेदनशील असल्याने व गेल्या काही महिन्यात धार्मिक हिंसाचाराचे प्रकार आसाममधे घडल्याने, यातून काही अनर्थ घडू नये याची काळजी सर्वांनीच घेणे आवश्यक आहे. ●

# .. ते देखे 'रवी'!

सुधीर जोगळेकर, ९८२००१६६७४



आर.एन. रवी
नवनियुक्त राज्यपाल,
नागालँड

जुलैच्या दुसऱ्या पंधरवड्यात सहा राज्यपालांच्या नव्या नियुक्त्या घोषित झाल्या आणि पूर्वोत्तर भारतातील तीन राज्यांना तीन नवे राज्यापाल मिळाले. ही राज्ये होती.

राज्यपालपदाचा दुसरा बदल त्रिपुराचा. कप्तानसिंह सोळंकी यांची मुदत संपून त्यांचे जागी नियुक्ती झाली ती रमेश बैस यांची. बैस १६ व्या लोकसभेचे सदस्य होते. छत्तीसगडमधील रायपूर लोकसभा मतदारसंघातून ते लोकसभेवर निवडून गेले होते, इतकेच नव्हे तर त्यांनी काही काळ मंत्रीपदही भूषवले होते.

तिसरा महत्त्वाचा बदल झाला नागालँडचा. गेली पाच वर्षे पद्मनाभ आचार्य तिथे राज्यपाल म्हणून कार्यरत होते. पाच वर्षांच्या याच कार्यकाळात त्यांना मणिपूर, अरुणाचल प्रदेश आणि त्रिपुरा या तीन राज्यांचा अतिरिक्त पदभार देण्यात आला होता. पाच वर्षांच्या नागालँडच्या कार्याकाळात पद्मनाभजी सर्वाधिक लोकप्रिय राज्यपाल तर ठरलेच, परंतु सामान्य माणसासाठी आणि राजभवनातील अतिसामान्य कर्मचाऱ्यांसाठी राजभवन आणि राज्यपाल हा हस्तिदंती मनोरा राहिला नाही, तो पद्मनाभजींच्या कार्यशैलीमुळे.

येत्या ८ ऑक्टोबरला वयाची ८८ वर्षे पूर्ण करुन पद्मनाभजींनी ८९ व्या वर्षात पदार्पण केले असते. राजकारणातही ७५ ही कमाल आयुर्मर्यादा ठरवणाऱ्या मोदी सरकारकडून ८९ व्या वर्षी पद्मनाभजींना किंवा त्याच वयातल्या राम नाईकांना राज्यपालपदाची दुसरी टर्म मिळणे शक्यच नव्हते.

■ ■ ■

**संरक्षण दलांच्या सुरक्षा सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार नागांशी अंतिम करार करण्याआधी अनेक कायदेशीर तरतुदींवर काम करण्याची गरज होती. रवी यांना याच कामाचे प्राधान्य देऊन नागालँडमध्ये पाठवण्यात आले आहे. पूर्वोत्तर भारताकडे विशेष लक्ष देण्याच्या मोदी सरकारच्या अजेंड्यावर नागा प्रश्न अति महत्त्वाचा मानला जातो आहे. रवी हे नागा समस्या सोडविण्याच्या प्रयत्नातले केंद्र सरकारचे अधिकृत संवादक मानले जातात. राज्यपालपदाची जबाबदारी आल्यानंतरही त्यांच्याकडील ही जबाबदारी कायम राहणार आहे.**

■ ■ ■

तेच घडले आणि आर. एन. रवी यांची नियुक्ती नागालँडसाठी झाली. ही नियुक्ती होण्यापूर्वी रवी हे राष्ट्रीय सुरक्षा सह सल्लागार म्हणून कार्यरत होते.

परंतु रवी यांना नेमण्यामागे केवळ हाच एक निकष नव्हता. नागालँडची चिघळती समस्या हाताळण्याचे जे अनेक प्रयत्न राजीव गांधी सरकारच्या काळापासून आत्तापर्यंत सुरु होते, त्याचेशी श्री. रवी यांचा जवळून संबंध आहे. रवी हे १९७६ च्या तुकडीचे आयपीएस अधिकारी. ते मूळचे केरळ कॅडरचे. केंद्रीय गुप्तचर खात्याचे प्रमुख म्हणून अजित डोवल कार्यरत असताना, त्यांच्या बरोबर काम करण्याची संधी रवी यांना मिळाली. गुप्तचर खात्याच्या पूर्वोत्तर भारताच्या कक्षात काम करण्याची संधी त्यांना मिळाली. २०१२ साली गुप्तचर विभागाचे विशेष संचालक म्हणून ते निवृत्त झाले परंतु काही काळापुरतेच. २०१४ साली

मोदी सरकार सत्तारुढ झाले आणि जॉइंट इंटेलिजन्स कमिटीचे प्रमुख म्हणून तीन वर्षाकरता सरकारने त्यांची नियुक्ती केली. नागालँडमधील घुसखोर दहशतवादी गट एनएससीएन (आयएम) बरोबर सरकार शांतता प्रस्थापनेसाठी जी बोलणी करत आहे त्याचे नेतृत्व त्यांच्याकडेच होते व आहे.

या बोलण्यातला पहिला महत्त्वाचा टप्पा गाठला गेला तो बरोबर चार वर्षांपूर्वी. ३ ऑगस्ट २०१५ रोजी भारत सरकारच्या वतीने रवी यांनी एनएससीएन (आयएम) बरोबर पहिला लेखी करार केला. १७ नोव्हेंबर २०१७ ला या प्रयत्नातले दुसरे यशस्वी पाऊल टाकले गेले. नागा नॅशनलिस्ट पोलिटिकल ग्रुप्सबरोबर दुसरा शांतता करार झाला. हा ग्रुप म्हणजे आणखी सहा सशत्र नागा दहशतवाद्यांची शिखर संस्था मानली जाते. जवळपास चार वर्षे होत आली, परंतु आजपर्यंत या कराराचे एकही कलम जाहीर झालेले नाही. केवळ एनएससीएन (आयएम) शीच रवी यांनी बोलणी केली असे कारण पुढे करुन त्यांच्यावर टीकाही झाली, परंतु बोलणी करायला दुसरा कुठलाच गट पुढे येत नाही आणि एनएससीएन (आयएम) इतका ताकदवर नागा गट दुसरा नाही या रवी यांच्या युक्तिवादावर प्रतिवादही झालेला नाही.

एनएससीएन (आयएम) ची प्रमुख मागणी आहे ग्रेटर नागालँडची. आसाम, मणिपूर आणि अरुणाचल प्रदेशात असलेल्या १०-१२ लाख नागांना एकत्र आणून त्यांचे ग्रेटर नागालँड बनवण्याची एनएससीएन (आयएम) ची मागणी आहे. या मागणीला या राज्यांचा विरोध आहे. नागांचे या मागणीसाठीचे आंदोलन कालआज सुरु झालेले नाही. ते पंडित नेहरूंचाा कारकिर्दीपासून सुरु आहे. संपूर्ण आशिया खंडातला तो एक सर्वाधिक काळ सुरु असलेला राजकीय लढा मानला जातो.

श्री. रवी यांना नागालँडला पाठवताना केवळ वय झालेले पद्मनाभजी हेच एकमेव कारण नव्हते. संरक्षण दलांच्या सुरक्षा सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार नागांशी अंतिम करार करण्याआधी अनेक कायदेशीर तरतुदींवर काम करण्याची गरज होती. रवी यांना याच कामाचे प्राधान्य देऊन नागालँडमध्ये पाठवण्यात आले आहे. पूर्वोत्तर भारताकडे विशेष लक्ष देण्याच्या मोदी सरकारच्या अजेंड्यावर नागा प्रश्न अति महत्त्वाचा मानला जातो आहे. रवी हे नागा समस्या सोडविण्याच्या प्रयत्नातले केंद्र सरकारचे अधिकृत संवादक मानले जातात. राज्यपालपदाची जबाबदारी आल्यानंतरही त्यांच्याकडील ही जबाबदारी कायम राहणार आहे.

नागालँडचे मुख्यमंत्री नैफयू रिओ यांनी रवी यांच्या नियुक्तीचे स्वागत केले आहे. अर्थात ते करण्याखेरीज त्यांना पर्यायही नव्हता. परंतु रवी यांच्याबरोबर काम करताना नागा समस्येवर कायम स्वरुपी तोडगा निघेल असा विश्वास रिओ यांनी व्यक्त केला आहे. एनएससीएन (आयएम) आणि नागा नॅशनलिस्ट पोलिटिकल ग्रुप्सनी रवी यांच्या नियुक्तीचे आश्‍र्चयुक्त भावात स्वागत केले आहे. रवी यांना या समस्येची जाण आहे, त्यांचा या समस्येचा अभ्यास आहे, आणि त्यांनी संवादक म्हणून काम केले असल्याने माणसांचे स्वभाव, त्यातील खाचाखोचा यांची त्यांना कल्पना आहे. जे इतर कुणा नव्या राज्यपालाला जमणे शक्य झाले नसते, रवी यांना ते शक्य होईल असा विश्वास व्यक्त केला जातो आहे.

“जे न देखे कवी, ते देखे रवी” हे केवळ काव्यात्मक भाषेतच म्हटले जाते असे नाही, ते जहाल समस्या सोडविण्याच्या जंजाळातही म्हटले जाते, आणि त्याचाच प्रत्यय बहुधा पूर्वोत्तर भारत येत्या काही काळात घेईल अशी शक्यता दिसते आहे.●

# मी “तो” नव्हेच



उपलब्ध माहितीनुसार “मोहम्मद सनाउल्हा” यांचा जन्म ३० जुलै १९६७ रोजी झाला. आसाममधील कामरुप जिल्ह्यातील कलहीकाश या गावाचे ते रहिवासी. १९८७ मध्ये ते भारतीय लष्करात भरती झाले. त्यांच्या अतिशय कष्टाळू आणि शिस्तप्रिय वागणुकीमुळे त्यांना २०१४ मध्ये राष्ट्रपतींकडून प्रशस्तिपत्रक मिळून गौरविले गेले. २०१२ मध्ये ज्युनिअर कमिशन अधिकारी म्हणून बढती मिळाली. भारतीय लष्करात तीस वर्ष सेवा करुन २०१७ मध्ये मानद कॅप्टन म्हणून सेवानिवृत्त झाले.

निवृत्तीनंतर आसाम पोलीसखात्यात त्यांना सहभागी करुन घेण्यात आले. परंतु आश्चर्याची गोष्ट म्हणजे परदेशी नागरिकांसाठी स्थापन झालेल्या न्यायासनाने सनाउल्हा यांना २५ मार्च १९७१ नंतर भारतात स्थलांतरीत झालेला परदेशीय नागरीक म्हणून घोषित केले आणि पोलीसखात्यातून बडतर्फ करण्यात आले. तसेच निवृत्त सरकारी कर्मचारी म्हणून मिळणाऱ्या सर्व सोयी-सुविधा खंडीत करण्यात आल्या. इतकंच नाही तर त्यांना गोलापाश येथील बराकीत स्थानबद्ध करण्यात आले. सनाउल्हा व त्याच्या कुटुंबियांनी न्यायालयात या निर्णया विरोधात याचिका दाखल केली तेव्हा त्याच्या वकीलांनी सनाउल्हा भारतीय नागरीकच असल्याचे सबळ पुरावे आहेत हे लक्षात आणून दिले.

बराकीत स्थानबद्ध असताना गणवेश आणि कार्यालयीन वस्तू जप्त करण्यात आल्या. सनाउल्हाच्या म्हणण्यानुसार आसाम बॉर्डर पोलीस, व्यवस्थापक किंवा सीमा पोलीस अधिकाऱ्यांचे हे त्यांच्या विरोधात षडयंत्र असावे असे मत त्यांच्या वकीलाने मांडले. स्थानिक वर्तमानपत्रांनी ही बाब प्रकाशात आणताना मोहम्मद सनाउल्हा हे कारगील युध्दातील वरिष्ठ आणि अनुभवी लष्करी अधिकारी आहेत असे म्हटले आहे. त्यामुळे समाज माध्यमांनी त्यांना न्याय मिळावा म्हणून त्यांच्यावरील अन्यायाचा निषेध करत दखल घेतली. त्याचवेळी त्यांच्या कुटुंबियांनी दाखल केलेल्या याचिकेच्या सुनावणीनंतर कोर्टाने अंतरिम जामीन मंजूर केला. त्यानुसार त्यांना स्थानबद्धतेतून मुक्त केले. याचिकाकर्त्यांनी रु. २०,००० इतक्या किमतीचा बाँड लिहून दिला. मुक्त करण्यापूर्वी सनाउल्हा त्यांच्या हातांच्या बोटांचे ठसे, डोळ्यांच्या बुबुळांचे बायोमेट्रीक फोटो घेतले गेले.

एका स्थानिक न्यूज चॅनेलला मुलाखत देताना तपास अधिकारी श्री. दास म्हणाले २००८ मध्ये सनाउल्हा हे मणिपूर येथील लष्करी मोहिमेत सहभागी होते. २००८ मध्ये ज्या व्यक्ती विरोधात

■ ■ ■

**यावरुन असे लक्षात येते की २००८ मध्ये परदेशी नागरीक म्हणून आरोप ठेवलेला सनाउल्हा आणि १९८७ ते २०१७ या कालावधीत लष्करी सेवेत कार्यरत असलेले निवृत्त सुभेदार सनाउल्हा या दोनही भिन्न व्यक्ती आहेत. ७ जून २०१९ रोजी सुभेदार सनाउल्हा यांची कोर्टाने जामिनावर सुटका केल्यामुळे त्यांच्या कुटुंबियांनी सुटकेचा निःश्वास सोडला खरा; परंतु कायदेशीर लढाई पुढे सुरुच रहाणार आहे.**

■ ■ ■

परदेशी घुसखोरी नागरीक म्हणून एफआयआर दाखल केला तेव्हा तीन साक्षीदारांनी सह्या केल्या त्यांचे म्हणणं असं आहे की ह्या सह्या खोट्या असून आम्ही या व्यक्तीला कधी भेटलोच नाही.

सना उल्हांच्या वकीलांनी त्यांची प्रभावीपणे बाजू मांडल्यामुळे त्यांची जामिनावर सुटका झाली. २००८ मध्ये परदेशी व्यक्तींबाबत न्यायालयाला सीमापोलीस अधिकाऱ्यांनी आपल्या तपासणीत जो अहवाल दिला होता त्यात असे म्हटले आहे की ज्या सनाउल्हा व्यक्तीचा आम्ही तपास लावला तो पन्नास वर्षाचा असून एका ठिकाणी कामगार म्हणून काम करत होता आणि तो गुप्त मार्गांनी भारतात घुसला.

यावरुन असे लक्षात येते की २००८ मध्ये परदेशी नागरीक म्हणून आरोप ठेवलेला सनाउल्हा आणि १९८७ ते २०१७ या कालावधीत लष्करी सेवेत कार्यरत असलेले निवृत्त सुभेदार सनाउल्हा या दोनही भिन्न व्यक्ती आहेत. ७ जून २०१९ रोजी सुभेदार सनाउल्हा यांची कोर्टाने जामिनावर सुटका केल्यामुळे त्यांच्या कुटुंबियांनी सुटकेचा निःश्वास सोडला खरा; परंतु कायदेशीर लढाई पुढे सुरुच रहाणार आहे. ●

## पृष्ठदान मास योजना, चिपळूण

नमस्कार चिपळूणकर!

आपणास माहिती आहे, की चिपळूण येथे नागालँडच्या मुलींचे एक वसतिगृह चालविले जाते; तसेच महाराष्ट्रात आणखी सात वसतिगृहे चालविली जातात. ह्या वसतिगृहांशी संबंधित तसेच ईशान्य भारतात होणाऱ्या घडामोडी आणि राजकीय, सामाजिक विषय आपण ईशान्य वार्ता ह्या मासिकाच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न गेली दहावर्षे करीत आहोत. ह्याचा परिणाम म्हणून समाजासाठी काहीतरी करु इच्छिणाऱ्या व्यक्ती संपर्कात आल्या. कुणी देणगी स्वरुपात मदत केली, तर कुणी कार्यकर्ते म्हणून पुढे आले.

समाजाला उपयुक्त ठरणाऱ्या ह्या मासिकाला मात्र कुणी दाता नसल्याने, दर महिन्याला जेमतेम खर्चात हा अंक छापून आपल्यापर्यंत पोहोचवला जातो आहे. ह्या अडचणीवर मात करण्यासाठी म्हणून पृष्ठ दानमास योजनेची संकल्पना वाचकांद्वारे समोर आली. व्यक्तीगत स्वरुपातील मदतीला सामुहिक योजनाबध्द स्वरुप दिले, तर त्यातून मासिकाला आर्थिक हातभार तर लागेलच शिवाय एक चळवळ उभी राहील. या विचारांती पृष्ठदान मास योजना आकाराला आली.

ह्या योजनेअंतर्गत आपण एका पृष्ठाची जबाबदारी घेऊन रु. १०००/- (रुपये एक हजार) मात्र देणगीस्वरुपात द्यावयाचे आहेत, जेणेकरुन एक महिन्याचा छपाई खर्च ह्या देणगीतून निघू शकेल. सहभागी होणाऱ्या नवीन सभासदांना वर्षभर ईशान्य वार्ताचा अंक सप्रेम भेट स्वरुपात पाठवण्यात येईल. चला तर मग चातुर्मासाच्या ह्या शूभमुर्हतावर आपण ह्या पवित्र कार्यात सहभाग नोंदवूया. सहकार्याबद्दल आम्ही आपले सदैव ऋणी राहू.

धन्यवाद!!

### पृष्ठदानासाठी संपर्क

गजानन पुरोहित, ईशान्य वार्ता वितरण प्रमुख - ९६७३५४१७७५

काशिनाथ आमणे, पृष्ठदान मास योजना प्रमुख - ८२७५४५४८८९

सौ. प्राजक्ता ओक, नागा मुलींचे वसतीगृह, चिपळूण - ९०२८९७२०९६ /९४२२९०५०८९

# मुष्टीयुध्द प्रवीण अंजू देवी - मणिपुरची सुवर्ण कन्या

- प्रतिनिधी



क्रीडा क्षेत्रात अतीशय मौल्यवान योगदान देण्याबद्दल मणिपूर ओळखले जाते. कारण येथे देशात व परदेशात आपल्या क्रीडा क्षेत्रात निपुण असणारे महान खेळाडू आढळून येतात, ज्यांनी आपल्या कौशल्याचे व सामर्थ्याचे प्रदर्शन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर केले आहे. मुष्ठीयोध्दात सामार्थ्यशाली असलेली मेरी कोम अथवा भारोत्तोलक संजीता चानू ही कांही नांवे सांगता येतील.

मणिपूरच्या प्रतिष्ठेत व किर्तीत आणखी एक मानाचा तुरा रोवणारी मुष्टीयुध्दात प्रवीण असणारी १६ वर्षीय अंजू देवी आता सगळयांच्या ओळखीची झाली आहे. जर्मनीत नुकत्याचा पार पडलेल्या ब्लॅक फॉरेस्ट कप स्पर्धेच्या पाचव्या फेरीत अंजू देवीने मुष्टीयुध्दात सुवर्णपदक मिळविले आहे.

पन्नास किलो वजनी गटात पाच भारतीय महिला मुष्टीयोध्यांनी भाग घेतला होता. त्यांत आंतरराष्ट्रीय मुष्टीयोध्दा स्पर्धेत अंजू देवीने सुवर्णपदक तर पटकाविलेच पण स्पर्धेतील "मोस्ट प्रामिसिंग बॉक्सर" हा किताब मिळवला. शिवाय भारतीय खेळाडुंच्या गटाला, दहा देशांच्या क्रिडा स्पर्धेत, आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वोत्कृष्ट म्हणून वाखाणण्यात आले.

सुवर्णपदक विजेती अंजू देवीचा आनंद व उत्साह ओसंडून वहात होता. पत्रकारांना मुलाखत देतांना ती म्हणाली की मला जे यश प्राप्त झाले आहे. त्यामुळे मी खूप आनंदात आहे. मुष्टीयुध्द या क्रीडा प्रकारात मी खूप सराव करुन प्रचंड मेहनत घेतली आहे; व त्याचे फळ हळूहळू दृष्टीक्षेपात

■ ■ ■

**आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धामध्ये अंजू देवीने आपल्या कौशल्याचा व मुष्टी युध्द प्रकारात प्रवीण असल्याचा प्रत्यय दिला आहे.**

**सध्या अंजू देवी, अमेरीकन प्रशिक्षक रोनाल्ड यांच्याकडे कर्नाटकातल्या एका खाजगी प्रशिक्षण केंद्रात मुष्टीयुध्द प्रकारात प्रशिक्षण घेत आहे. आपल्या येथील प्रशिक्षणाबद्दल अंजू देवी म्हणतात, की रोनाल्ड यांच्याकडे प्रशिक्षण घेतांना खूप उत्साह वाटत आहे. मुष्टीयुध्द प्रकारातले बारकावे व वेगवेगळ्या कौशल्यपूर्ण पध्दती व आगळे तंत्र या सगळ्यांचा प्रशिक्षणात मला परीचय होतो आहे.**

■ ■ ■

येत आहे. माझ्या क्रीडा शिक्षकांनी याबाबत मला खूप प्रोत्साहन दिले आहे. सन २०२० पर्यंत माझी आंतरराष्ट्रीय खेळाडू अशी प्रतिमा निर्माण व्हायला हवी असे ते निक्षुन सांगतात व परत परत या गोष्टीची आठवण करुन देतात. या स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त करुन हळूहळू माझ्या शिक्षकांची अपेक्षा मी पूर्ण करीत आहे असे मला वाटते.

अंजू देवीने मुष्टीयुध्द प्रकारात सन २०१२ पासून प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली. तिच्या प्रशिक्षकांचे नांव चित्तरंजन सिंग आहे. दृढनिश्चय, करारीपणा , प्रचंड मेहनत या गुणाच्या बळावर अंजू देवीने अनेक स्थानक व राष्ट्रीय स्तरांवर यश प्राप्त केले आहे.

अंजू देवीने मुष्टीयुध्द प्रकारात मेरी कोम यांचा आदर्श ठेवला आहे. अंजू देवी म्हणतात की

मुष्टीयुध्द हा क्रीडा प्रकार शिकून स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणे व त्यामुळे आपल्या देशाची मान उंचावणे हेच माझे लक्ष्य असून त्यासाठी मेरी कोम याचा माझ्यासाठी आदर्श आहेत.

आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धामध्ये अंजू देवीने आपल्या कौशल्याचा व मुष्टी युध्द प्रकारात प्रवीण असल्याचा प्रत्यय दिला आहे.

सध्या अंजू देवी, अमेरीकन प्रशिक्षक रोनाल्ड यांच्याकडे कर्नाटकातल्या एका खाजगी प्रशिक्षण केंद्रात मुष्टीयुध्द प्रकारात प्रशिक्षण घेत आहे. आपल्या येथील प्रशिक्षणाबद्दल अंजू देवी म्हणतात, की रोनाल्ड यांच्याकडे प्रशिक्षण घेतांना खूप उत्साह वाटत आहे. मुष्टीयुध्द प्रकारातले बारकावे व वेगवेगळ्या कौशल्यपूर्ण पध्दती व आगळे तंत्र या सगळ्यांचा प्रशिक्षणात मला परीचय होतो आहे. तसेच इंग्रजी बोलण्याचे कौशल्य व त्यांत सुधारणा या गोष्टी प्रशिक्षक रोनाल्ड यांच्यामुळे शक्य होत आहेत.

आपले मुष्टीयुध्दातले कौशल्य व शक्तीशाली आणि प्रबळ असा ठोसा त्यामुळे अंजूदेवीची या वर्षीच्या एशियन गेमस् व सरबिअन युथ क्रीडा स्पर्धांसाठी निवड होण्याची शक्यता आहे. एका मणिपुरी मुलीसाठी ही निश्चित अभिमानाची गोष्ट आहे. ●

## नागा मुलींचे वसतिगृह, चिपळूण
## तायक्वांदो स्पर्धेत प्रथम क्रमांक

अभ्यासाव्यतिरिक्त एक तरी कला अंगी असावी, ज्याचा उपयोग पुढील आयुष्यासाठी होऊ शकेल असा विचार कायमच आम्ही सगळे समिती सदस्य करीत असतो. मुलींजवळ कला गुण आहेत. पण त्यांना योग्य ते मार्गदर्शन मिळण्यासाठी चिपळूणमध्ये फार सुविधा उपलब्ध नाहीत ही कायम सल आहे माझ्या मनात. त्यातल्या त्यात जे उपलब्ध आहे, ते त्यांना देण्याचा प्रयत्न आम्ही सगळे करत असतो, मुलीही त्यात रस घेऊन शिकण्याचा प्रयत्न करत असतात.

गेली दोन वर्षे आपण काही मुलींना तायक्वांदोचे प्रशिक्षण देत आहोत. त्यांचे शिक्षक त्यांना स्पर्धेत सहभागी करुन घेतात. संपूर्णतः देणगीवर चालणाऱ्या संस्थेतील मुलींना स्पर्धेत उतरवताना श्री. आवळे सर त्यांच्या परीने आम्हाला पूर्ण सहकार्य करत असतात. एरवी ही प्रशिक्षण शुल्क ते घेत नाहीत. त्यांच्या ह्या सहकार्यामुळेच आम्हाला सर्व शक्य होते. त्यासाठी त्यांचे चिपळूण वसतिगृह समितीतर्फे मनःपूर्वक धन्यवाद.

दोन दिवस तायक्वांदो असोसिएशनच्या जिल्हा स्तरीय स्पर्धा देवरुख येथे पार पडल्या. ह्या स्पर्धेत कु. नुकुसुन, कु. रीखवी, कु. केणी व कु. अझुवी ह्या विद्यार्थीनींना सहभाग नोंदवला. त्याबद्दल सर्वांचे अभिनंदन.

ह्या स्पर्धेत यशस्वी झालेल्या दोन विद्यार्थीनींपैकी कु. नुकुसुन हिने सुवर्णपदक मिळवून विजय प्राप्त केला व कु. केणी हिला कांस्य पदक मिळाले आहे. ह्या त्यांच्या यशाबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक श्री. आळवे सर ह्यांचे आभार! अशाच यशस्वी होत रहा....

**- प्राजक्ता ओक**

# चेरापुंजी : मेघालयाचे वैभव

- मनिषा कुलकर्णी



चेरापुंजी किंवा सोहरा हे पूर्व खासी हिल जिल्ह्यातील राज्य, मेघालय इथं वसलं आहे. याचं मूळ नाव खरं तर सोहराच पण ब्रिटिश चुरा चुरा म्हणत त्यावरुन त्याचा अपभ्रंश चेरापुंजी असा झाला. पण राज्य सरकारने पुनश्च त्याचे नामकरण सोहरा असंच केलंय. खासी हिल्स आणि पर्यायाने सोहरा इथं फुलपाखरे आपली जैववैविधता प्रचंड प्रमाणात दाखवतात. त्यामुळे गारो आणि खासी हिल्स माझ्या आकर्षणाचे विषय ठरले आहेत. समुद्रसपाटीपासून अदमासे ४८६९ फूट उंचीवर वसलेलं हे गाव जगाच्या नकाशावर भारताची वेगळी ओळख करुन देतं, ती म्हणजे सर्वाधिक पाऊस पडणारे ठिकाण.

इथली मूळ जमात किंवा रहिवासी, "खासी" लोक, त्यांची भाषाही खासीच. १६ व्या ते १८ व्या शतकात "खिरिमेय" या राजवटीची इथं सत्ता होती. इथलं ठळक वैशिष्ट्य म्हणजे मातृसत्ताक पध्दती. लग्न झाले की नवरा मुलीच्या घरी जातो. नयनरम्य धबधबे, खोल दऱ्या, वैविध्यपूर्ण वृक्ष अन् झाडे, प्रचंड प्रमाणात आढळणारी पशू-पक्षांची विविधता, जागोजागी असलेल्या गुहा आणि वनश्री ही या राज्याची दुसरी ओळख. एका बाजूला बांगलादेशाच्या सीमेने वेढलंय, त्यामुळे कायम घुसखोरीचा धोका. इथं येण्याचा सगळ्यात उत्तम मोसम म्हणजे ऑक्टोबर - नोव्हेंबर. कारण हवामानही सुरेख असतं आणि नोंगक्रेम नृत्य, शाद-सुक-मिनीसीमेम हे दोन मोठ्या प्रमाणात साजरे होणारे पारंपारिक उत्सव आहेत. ते पहायची मौज घेऊ शकता. हे उत्सव पारंपारिक वेषात शांतता व राज्याच्या प्रगतीसाठी साजरे केले जातात, तर शाद सुक उत्सव गत वर्ष ईश्वर कृपेने चांगलं गेलं म्हणून ईश्वरप्रती कृतज्ञता म्हणून साजरं करतात. स्त्री पुरुष खास पारंपारिक पध्दतीने व वेषात वावरत असतात, सगळीकडे रंगीबेरंगी व उल्हासपूर्ण वातावरण असतं. या उत्सवात मुख्य अन्न म्हणजे भात आणि स्थानिक चवदार मासे किंवा मांस त्याशिवाय बांबू पासून बनवलेले चटकदार पदार्थ जेवणात असतात. जाधो, किकपू, तुंग रिबई हे त्यांचे काही खास पारंपारिक पदार्थ. ९० टक्के लोक जरी ख्रिस्ती असले तरी किमान १० टक्के लोक "का नियाम खासी" या पारंपारिक धर्माचे पालन करतात.

सकाळी लवकर उठून रिसॉर्ट सोडून आम्ही पुढला टप्पा गाठणार होतो. इथं दोन्ही दिवस प्रचंड पाऊस आणि रात्री तर आमच्या कॉटेजवर एक झाड अर्धवट कोसळले होते. त्यामुळे रात्रभर तसं जागरणच झालं होतं. खरं तर पाय इतके भरुन आले होते, पण पर्याय नव्हता. आज आम्ही बघणार होतो चेरापुंजी जवळ असलेल्या आराव्हा केव्हज. या अतिशय सुरेख अशा फोसिल्स (जिवाष्म) साठी प्रसिध्द

असलेल्या गुहा आहेत. वर जाईपर्यंत थोडी चढण आहे आणि मग गुहा आहेत. मला गुहेचा "फोबिया" आहे. कारण एकदा मी दक्षिण मेघालयात असलेल्या सेजू गुहेत गेले होते तिथे माझा श्वास गुदमरला होता. मी घाबरुन अर्ध्यावरुनच परतले होते. पण आज मात्र मी उत्साही होते, कारण नुकताच एम एस सी पार्ट वनच्या नव्याने होऊ घातलेल्या अभ्यासक्रमात मी फोसिल्स स्टडी विशेष रुपाने इन्ट्रोड्युस केली आहे. तरीही आता एकटीने प्रवेश करताना मागील इतिहास आठवून कावरी-बावरी झालेच. अतिशय सुंदर असलेल्या या गुहेत मृदुकाय मोल्लूसक यांचे पुष्कळ जिवाष्म आहेत. गुहा फार विस्तारित नाही (म्हणजे पर्यटकांसाठी मर्यादित ठेवलीय, बाकी बंद आहे.) वाटेत झुळझुळ पाण्याचे झरे लागतात. मुख्य म्हणजे जागोजागी दिवे लावून पाहण्यासाठी उत्तम सोय केली आहे. संपूर्ण गुहा पाहून बाहेर आल्यानंतर वर चढून गेल्यावर पूर्ण सोहरा चा नजारा दिसतो. दुर्दैवाने आम्ही गेलो तेव्हा पाऊस आणि धुके इतके होते की जवळचं पण दिसत नव्हतं आणि आदल्या दिवसाच्या रुट ब्रिज मुळे पायाची चाळण झाली होती! ■

## अलिबागमधून सैनिकांसाठी रक्षाबंधन



रक्षाबंधनासाठी अलिबाग तालुक्यातून राख्या गोळा करण्यात आल्या. या राख्या सीमेवरील सैनिकांसाठी पाठवण्यात येणार आहेत. ३ महाविद्यालये व शाळा व २ शिकवणीवर्गातून साधारण ४०० राख्या जमा झाल्या. पत्रं व शुभेच्छा पत्रही मोठ्या प्रमाणात मिळाली. सर्व राख्या अरुणाचल, उत्तराखंड येथील सैनिकांना पाठवण्यात येणार आहेत.

**- सुशिल सैकर, अलिबाग**

## Chemistry Graduates from Nagaland brought by Dharmsi Moraji Company



Dharamsi Moraji Chemical Company Ltd. has brought about 10-20 chemistry graduates from Nagaland to work as full time apprentice at their Roha factory. Dilip Gokhale Vice President and other executives of the company with the wholehearted co-operation of the managent arranged and supervised the exercise. Suhas Savarkar Vile Parle was also actively involved in the project. He had proposed it to the company. **Shri Padmanabh Acharya Hon. Governor of Nagaland supported the exericse.**

# आसामची शान सुवर्णकन्या हिमादास




भारताची युवा धावपटू आसामच्या हिमादासची सोनेरी घौडदौड आपणा सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. हिमाने आता ४०० मीटर धावण्याच्या प्रकारात सुवर्ण पदक पटकावलं आहे. याआधी हिमाने चार सुवर्ण पटकावली आहेत. तिचं हे पाचवं सुवर्णपदक आहे. यातील चार सुवर्ण पदकं २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेतील आहेत. झेक रिपब्लिकमध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत तिनं ४०० मीटर अंतर ५२.०९ सेकंदात पूर्ण केलं. हिमाची ही कामगिरी या हंगामातील सर्वोत्तम ठरली आहे. २ जुलै रोजी तिनं पहिलं सुवर्ण पटकावलं. त्यानंतर सुवर्णपदकांचा धडका तिनं कायम ठेवला आहे. यावर्षी तिला पाठदुखीमुळं आशियाई चॅम्पियनशिप स्पर्धेतून बाहेर पडावं लागलं होतं. ८ जुलैला झालेल्या स्पर्धेत हिमाने २३.९७ सेकंदात २०० मीटर अंतर पार करत सुवर्ण पदकावर नांव कोरंल होतं. त्यानंतर क्लांदो मेमोरियल ॲथलेटिक्स स्पर्धेत हिमानं २०० मीटर प्रकारात तिसरं सुवर्ण पटकावलं. हिमानं २०० मीटर अंतर २३.४३ सेकंदात पार केलं. वर्ल्ड ज्युनिअर चॅम्पियन असलेल्या आणि ४०० मीटरमध्ये राष्ट्रीय विक्रम नावावर असणाऱ्या हिमाची सर्वोत्तम वेळ २३.१० इतकी आहे. गेल्याच वर्षी तिनं ही वेळ नोंदवली होती. गेल्या वर्षभरापासून हिमा पाठदुखीने त्रस्त आहे. त्यातही तिने जबरदस्त कमबॅक करत आपली कामगिरी उंचावली आहे.

तिचं घर पाण्यात बुडालं होतं, तरी ती देशासाठी धावली. आसामची असणारी हिमा दास हिचे घर पुरामध्ये वाहून गेले. आसाममध्ये ब्रह्मपुत्रा नदीने धोक्याची पातळी ओलांडली. तिथलं जनजीवन विस्कळीत झालं, महापूर आणि जमिन खचल्याच्या घटना घडल्या. आसाममध्ये एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार ४ हजार १७५ गावातील जवळपास ५० लाख लोकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. पुरग्रस्तांच्या मदतीला एनडीआरएफची पथके कार्यरत आहेत. हिमा दासनं आसाममधील पुरग्रस्तांसाठी तिचं अर्ध वेतन दिलं आहे. हिमाने इंडियन ऑईलकडून मिळणाऱ्या वेतनातील अर्धी

रक्कम पुरग्रस्तांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीत दिली आहे.

आसामची नवीन आयडॉल हिमा दासचं यश आसामी माणसाला भूषणावह होतंच , आता तर तिने एकाच आठवड्यात तीन सुवर्णपदकं जिंकण्याची कमाल करत साऱ्या पूर्वांचलालाच आनंदाची भेट दिली आहे. आणि तो आनंदही किती असावा?

हिमाला सुवर्ण पदक मिळाल्यावर तिच्या वडिलांशी संपर्क केला. ते तिकडे दूर आसामच्या नागाव जिल्ह्यातल्या धिंग गावात. सध्या सारा आसामच पाण्यात बुडाला आहे. धिंग गावातही पूर आलेला आहेच. जगणं मुश्कील, मोबाईलला रेंज मिळणंही कठीणच, फोन लागला तर हिमाचे वडील रोंजीत दास खूश होते. ते म्हणाले, “गर्व तो है! अच्छा खेलती है!” साधं वाक्य मात्र त्यात लेकीविषयी अभिमान ओतप्रोत भरलेला आहे. आसामी माणसाच्या साध्या , नम्र, कष्टप्रद जगण्यात त्यांच्या लेकीचं यशही ते अत्यंत नम्र आणि मृदू आवाजात स्वीकारतात. तेच हिमाचे प्रशिक्षक निपॉन दास यांचंही. ते आता गुवाहाटीत आहेत. निपॉनदा आणि निबाजीत मालकर हे तिचे दोन स्थानिक प्रशिक्षक होते. त्यांनी




साथ दिली, प्रशिक्षण दिलं म्हणून हिमा आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचली. निपॉनदांच्या शब्दांत प्रचंड अभिमान असतो. हिमाची गुणवत्ता आणि टॅलेण्ट जे त्यांना एकेकाळी दिसलं होतं ते तिनं जगासमोर सिध्द केलं याचा अभिमान त्यांच्या बोलण्यात असतोच. मात्र तेही सांगतात, “उसको सिर्फ टायमिंग समझ में आता है, वो सिर्फ टायमिंग के पिछे भागता है, किसी और के रेस में नहीं भागता!”

आजच नाही तर अगदी नवीन होती, तेव्हाही हिमाला फक्त फिनिशिंग लाइनच दिसायची. निपॉनदा सांगतात, “उसको  बस फिनिशिंग लाईन दिखता है, वो बोलता है सर आप सिर्फ टायमिंग बोलो, मै वो टायमिंग लाके दिखाता.” आता एकाहून एक टायमिंग देत, ती सुवर्णपदक जिंकत सुटली आहे. पोरगी तशी एकदम बेधडकच. टॉम बॉय. बोलायला कुणाला ऐकणार नाही. घरात सहा भावंडं, ही धाकटी. पायात वेग असा की गावातली पोरं हिला फुटबॉल खेळायला घेत नसत. तिथं भांडून खेळावं लागे. शाळेत रनिंग रेस व्हायच्या, त्यात हिनं भाग घ्यावा म्हणून त्याचा तगादा लागायचा. पण हिला पळण्यापेक्षा फुटबॉलमध्ये जास्तच रस. तिला इंडिया जर्सीचं मोठ अप्रूप. ती बरोबरीच्या पोरांना सांगायची, इंडियाचा टी शर्ट मिळायला पाहिजे, आणि ते तिनं करुनही दाखवलं. ■ **(संकलित)**

# कबाडकष्टांच्या मुशितच खेळाडू तयार होतात

विवेक पाटील, मुंबई, ९३२४०९४२७०

ह्या विषयावर लिहायचं म्हटलं तर खेळाडू आणि प्रशिक्षक म्हणून काहीतरी वाईटच लिहिन म्हणून स्वत:ला अडवून ठेवलं होतं. पण आपला समाज आणि व्यवस्थाच अशी आहे की दररोज आजूबाजूला हजारो हिमादासांच्या स्वप्नांचा चुराडा झालेला आपण पाहतो. क्रीडा क्षेत्रातच नाही तर इतरत्रही! अपेक्षा ही असते की त्यांनी बाप पण दाखवावा; बंधू आणि सखाही! सूर्य दाखवला तरी जयंद्रथांच्या ढेंगांखालून जावं आणि दुर्योधनांची गुर्मी आणि दु:शासनांची वासना झेलावी. जन्मापासून सेकंडक्लास सिटीझन्स म्हणून जगता जगता वर्ल्डक्लास ॲथलेट म्हणून सिध्द करण्यासाठी अग्नीपरिक्षा देत रहावी.

त्यात, खेळातही पैश्याचा थिल्लरपणा आल्यामुळे जिथे शारीरिक दमखम लागतो तिथंही थोरामोठ्यांच्या कुलिन शालिन, आणि कदाचित स्वल्पदर्जाच्या खेळाडूंच्याकरता व्यवस्था बटिक बनून राबतेय. जे लोक खेळ खेळलेयत त्यांना माहिती असेल की खेळाडूंना प्रशिक्षण आणि संधी योग्य वेळी मिळाली नाही, तर त्यांचं टॅलेंट असंच सडतं. किंबहुना मी जवळची उदाहरणं देऊन सिध्द करेन. पण इथल्या द्रोणाचार्यांनां ही फाईल फिरवणे आणि व्यवस्थेची हांजीहांजी करणे ह्यापलिकडे काही दिसेनासे झाल्याने पैसा आणि संसाधने योग्य मुलांपर्यंत पोहचत नाहीत.

बाकी गरिबी आणि कबाडकष्टांच्या मुशितच जागतिक दर्जाचे खेळाडू बनतात हा जागतिक क्रीडाक्षेत्राचा इतिहास आपण बनिया आणि बाबूलोक सोयीस्करपणे दखलअंदाज करतोय. कारण तिथंही रिटर्न ऑफ इनव्हेस्टमेंट पाहिलं जातंय. इथं गोरगरिबांच्या रक्त, अश्रू आणि घाम यांची किंमत शून्य आहे. आपल्याकडे खेळाडू खेळाडू म्हणून असताना ऊर फुटेस्तोवर

■ ■ ■

**बाकी गरिबी आणि कबाडकष्टांच्या मुशितच जागतिक दर्जाचे खेळाडू बनतात हा जागतिक क्रीडाक्षेत्राचा इतिहास आपण बनिया आणि बाबूलोक सोयीस्करपणे दखल अंदाज करतोय. कारण तिथंही रिटर्न ऑफ इनव्हेस्टमेंट पाहिलं जातंय. इथं गोरगरिबांच्या रक्त, अश्रू आणि घाम यांची किंमत शून्य आहे. आपल्याकडे खेळाडू खेळाडू म्हणून असताना ऊर फुटेस्तोवर राबतो आणि नंतर हातापायातील वंगण संपल्यावर खोपच्यात सडून मरतो.**

■ ■ ■

राबतो आणि नंतर हातापायातील वंगण संपल्यावर खोपच्यात सडून मरतो.

हल्ली फक्त खेळाडूंवर चित्रपट बनतात, त्यामुळे त्याचा रोल करणारा हिरो किंवा हिरॉईन बाहेरील जगासमोर करोडोंची खेळी खेळतो; पण मूळ खेळाडू लहानपणी न मिळणारे भत्ते आणि शिष्यवृत्त्या आणि मोठेपणी सर्टिफिकेटवर वजन ठेऊन मिळालीच तर लाभणारी नोकरी आणि कामावरील उच्चशिक्षित उच्चभ्रू लोकांकडून मिळणारी सब स्टँडर्ड वागणूक ह्याच चाकोरीत अडकून असतो. आणि तुम्ही?? फेसबुकवर पोष्टी टाकणारे! एखादं फॉरवर्ड किंवा कॉपीपेस्ट मारलं की लगेच भारतात हिमा दासची फॅक्टरी लागली अश्या सोयीस्कर संभ्रमात राहू नका. फॅक्टरी लागेल ती शूकंपनीची! म्हणूनच आजूबाजूच्या कुठल्यातरी हिमा दासला मदत करा. तुमच्यात दम असेल तर तिच्यापाठीमागे उभे रहा.●

# ईशान्य भारतातच जन्मला होता ए.टी.एम चा जनक

**प्रवीण कारखानीस, ०९८६०६४९१२७**

बँकिंग क्षेत्रात युगप्रवर्तक ठरलेल्या "ए.टी.एम." चा वापर जगात प्रथम सुरु झाला तो २७ जून १९६७ या दिवशी! जगातले पहिले असे यंत्र बसविण्यात आले ते इंग्लंडमधल्या, मिडलसेक्स परगण्यातल्या एन्फिल्ड या गावात, बार्कलेज बँकेच्या बाहेरच्या भिंतीवरती! त्याचे समारंभपूर्वक उद्घाटन करुन ज्याने अशा यंत्राद्वारे प्रथम पैसे काढले तो असामी होता. त्याकाळचा विख्यात ब्रिटीश हास्य-अभिनेता रेग वार्ने.

तेव्हा आजच्यासारखे प्लास्टिक कार्ड नव्हते, तर चेकसारखी स्लीप यंत्राच्या खणात ठेवून, चार आकडी पिन टाकून, यंत्राकडे दहा पौंड इतकी निश्चित रक्कम मागितली की, सर्व काही ठीक असेल तर यंत्रातून दहा पौंडाची नोट बाहेर यायची अशी व्यवस्था होती. या अजब-गजब यंत्राचा शोध लावणारा चक्क भारतात जन्मलेला आसामी होता! त्याचे नाव जॉन अड्रीयन शेफर्ड बरॉन. त्याचे आई-वडील स्कॉटिश होते. वडील तत्कालीन ब्रिटीश इंडियातल्या "चित्तगाव पोर्ट कमिशन" मध्ये मुख्य अभियंता होते. (पुढे इंग्लंडला परतल्यावर ते "लंडन पोर्ट अथॉरिटी" चे मुख्य अभियंता आणि "इन्स्टिट्यूट ऑफ सिव्हील इंजिनियरिंग चे प्रेसिडेंट झाले) जोन शेफर्ड यांची आई डेरोथी शेफर्ड ही तर ऑलिम्पिक आणि विम्बल्डन स्पर्धेत चमकलेली स्टार टेनिसपटू होती.



John Shephered Barron

जॉन शेफर्ड हे २३ जून १९२५ रोजी, ब्रिटीशकालीन आसामची राजधानी शिलाँग येथे जन्मले आणि वाढले होते. त्यांचे उच्च शिक्षण मात्र केंब्रिज विद्यापिठाच्या ट्रिनिज कॉलेजमध्ये आणि नंतर एडिन्बरा विद्यापीठात झाले होते. ते स्वत: बँक नोटस् प्रिंटीग करणाऱ्या कंपनीचे सर्वेसर्वा होते. तथापि एके दिवशी त्याना रोख रकमेची निकड असताना ते बँकेत पोहोचेपर्यंत बँक बंद झाल्याने त्यांची मोठीच पंचाईत झाली. घरी परतल्यावर आंघोळ करताकरता त्यांना अशा एका यंत्राची कल्पना सुचली, ज्या यंत्राद्वारे बँक बंद असतानाही आपल्या खात्यातून रोख पैसे काढता येतील! त्यासाठी केमिकल्सचा वापर करुन त्यांनी विशिष्ट प्रकारच्या कागदी स्लिप्स तयार केल्या. सुरुवातीला सहा आकडी पिन तयार केले परंतु त्याला त्यांच्या पत्नीने आक्षेप घेतला. सहा आकडी पिन लक्षात ठेवण कठीण आहे असे तिने सांगताच त्यांनी चार आकडी पिन तयार केला.

आजही आपल्याकडचा पिन चार आकड्यांचाच असतो! जॉन शेफर्डच्या या शोधाने बँकिंग विश्वात क्रांती झाली. या शोधासाठी त्याने कोणताही मोबदला घेतला नाही. इंग्लंडच्या राणीने त्याला २००५ मध्ये ऑर्डर ऑफ द ब्रिटीश एम्पायर हा सन्मानाचा किताब दिला. त्याने विकसित केलेल्या कॅश मशीन मध्ये नंतर बऱ्याच सुधारणा झाल्या. प्लास्टिक कार्डस् आली. अमेरिकेत २ सप्टेंबर १९६९ रोजी न्यूयॉर्क मधील केमिकल बँकेने त्यांच्या रॉकव्हिले सेंटर शाखेत त्या देशातले पहिले कॅश मशीन सुरु केले. आज जगभरात लाखो ठिकाणी कॅश पॉइन्टस् अथवा ए.टी.एम्. चा वापर चालू आहे! ●

# काय पण तोडगा!
## म्यानमारमधील रखिन प्रांताचा बांगला देशात विलिनीकरण करण्याचा प्रस्ताव

- प्रतिनिधी




"फुकट फौजदार आणि जावई सुभेदार" अशी एक म्हण मराठीत आहे. आणि नसली तरी नव्याने निर्माण व्हायला हरकत नाही. त्याला कारण म्हणजे अमेरिकेची आंतरराष्ट्रीय राजकारणातील दादागिरी आणि प्रत्येक विषयात नाक खुपसण्याची वृत्ती. याच्या मुळाशी आहे जागतिक शांततेची ठेकेदारी आपल्याकडेच असल्याची घमेंड.

आता हेच बघाना! म्यानमार आणि बांग्लादेश यांच्यातील द्वीपक्षीय रोहिंग्या निर्वासितांच्या प्रश्नात लक्ष घालण्याचे अमेरिकेला काय कारण आहे? काहीच नाही! पण अमेरिकेच्या आशिया-पॅसिफिक समितीचे अध्यक्ष ब्रॅडली शेरमन यांनी म्यानमारमधील रखिने प्रांतच बांगलादेशात विलिन करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. अर्थातच हा प्रस्ताव म्यानमार आणि बांग्लादेश या दोनही देशांनी धुडाकावूनच लावला आहे.

रोहिंग्या निर्वासितांचा प्रश्न उद्भावला तो २०१७ मध्ये बौध्द व रोहिंग्या या म्यानमारमधील दोन वांशिक गटात उद्‌भवेलल्या संघर्षामुळे. रोहिंग्या मुसलमानांच्या आक्रमक वृत्तीमुळे त्यांच्या कायमचा काटा काढण्याचा निर्णय म्यानमार सरकारने घेतला होता. या संघर्षाच्या निमित्ताने म्यानमारने रोहिंग्याविरुध्द लष्करी कारवाई केली गेली. त्यात सुमारे सात लाख रोहिग्यांनी त्यांची गावं सोडून पलायन केले व जवळच्या बांग्लादेशात आश्रय घेतला. आधीच लोकसंख्येचा स्फोट झालेल्या बांग्लादेशाला ह्या अधिकच्या लाखो निर्वासितांचा भार पेलवणे कठीण झाले आहे. त्यामुळे चीनला मध्यस्थीची गळ घालून हा प्रश्न सोडवण्यासाठी आणि म्यानमारवर दबाव आणण्यासाठी बांग्लादेशाच्या पंतप्रधान शेख हसिना चीनच्या दौऱ्यावर गेल्या.

यातील महत्त्वाची बाब अशी की म्यानमार सरकार यातील एकाही रोहिंग्या कुटुंबाला म्यानमारमध्ये थारा द्यायला राजी नाही. शिवाय रखिने किनारपट्टीचा मोक्याचा भूभाग बांगलादेशला देण्याचा मूर्खपणा म्यानमार कशासाठी करील? परंतु यापैकी एकाही मुद्दयाचा व्यवहार्य विचार न करता अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे सुभेदार ब्रॉडली शेरमन यांनी हा फुकटचा सल्ला देण्याचा नाक खुपसेपणा केला आहे. ●

# समान कामासाठी समान वेतन - नागा महिलांचा संघर्ष

- प्रतिनिधी

नागालँडमधील फेक जिल्ह्यातील चिमाझी गावांतील महिलांनी पुरुषांइतकेच समान वेतन मिळविण्यासाठी आठ वर्षे संघर्ष करुन यश प्राप्त केले आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या संघर्षात त्यांच्या समाजातील संवेदनाशील पुरुषांनी त्यांना मदत केली आहे.

या गावातील शेतकरी सांगतात की पूर्वीच्या काळी जेव्हा मजुरी ही धान्य अथवा एखाद्या वस्तूच्या स्वरुपात मिळायची तेव्हा महिला व पुरुष यांच्यात त्याबाबत असमानता नव्हती. प्रत्येक दिवसाची मजुरी म्हणून प्रत्येक महिला व पुरुषाला तीन माप धान्य मिळत असे. पण पैशाच्या स्वरुपात मजुरी मिळू लागली तेव्हांपासून असमानता अस्तित्वात आली.

चिमाझी खेड्यातील महिलांचे रास्त गाऱ्हाणे असे आहे, की शेतात लागवड करताना नांगरणी, पेरणी इत्यादी अति कष्टाची कामे ही पुरुषांनाच करावी लागतात असे भासवले जाते व त्यामुळे त्यांना अधिक मजुरी दिली जाते. पण आम्ही महिला जे काम करतो ते पुरुष करुच शकत नाहीत. लागवड करण्यापूर्वी दिवसभर शेतात ओणव्याने तेथील काडी कचरा उचलण्याचे अतिकष्टाचे व शरीराला ताण देणारे काम हे फक्त महिलाच करु शकतात. कोणत्याही यंत्राचा आधार न घेता चिमाझी खेड्यातल्या या महिला शेतात दिवसभर अतिशय कष्टाची कामे करीत असतात.

या खेड्यातील महिला गटाच्या अध्यक्षा म्हणतात की समान वेतन मिळावे म्हणून आम्ही आमच्या खेड्यातील ग्रामपंचायतीकडे पाठपुरावा केला. २००७ पासून ग्रामपंचायतीच्या कल्याणकारी मंचासमोर आम्ही समान वेतनाची कल्पना सादर केली. पण प्रत्येक वेळी आम्हाला नकार देण्यात आला. पंचायतीतले पुरुष म्हणू लागले की महिलांना समान वेतन मिळण्याची मागणी निषिध्द आहे. पुरुष हे कुटुंब प्रमुख असल्याने त्यांना मान द्यायला हवा व त्यांच्या इतकेच वेतन मिळावे अशी मागणी करणे म्हणजे त्यांचा अपमान करण्यासारखेच आहे.

■ ■ ■

**चिमाझी खेड्यात चाखेसँग जमातीचे लोक राहतात. येथील महिलांना समान वेतनाच्या लढ्यात यश मिळाल्याने त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला असून आदराची वागणूक मिळत आहे. आता नागालँड मधील इतर गावांतल्या महिलांना प्रेरणा मिळाली असून त्यांनी समान वेतनाची मागणी लावून धरली आहे. चिमाझी खेड्यातल्या महिलांना या गोष्टीचा अभिमान आहे, की त्यांच्या श्रमाला समान मूल्य प्राप्त झाले आहे. त्या महिला आपल्या मुला-नातवांना अभिमानाने सांगू शकतात, की आमच्या पिढीने समान वेतनाचा मुद्दा लावून धरला व समान वेतन प्राप्त करुन घेतले.**

■ ■ ■

नागालँडमधील समाजात पितृसत्ताक पध्दतीचा वरचष्मा आहे. तेथील चालीरीतींना अनुसरुन महिलांना वारसा हक्क सुध्दा नाकारण्यात येतो. राजकीय वर्तुळात महिलांचे अस्तित्व नगण्य आहे. पण नॉर्थ ईस्ट नेटवर्क या संस्थेने महिलांच्या समान वेतन मिळण्याच्या संघर्षाला योग्य मार्गदर्शन केले . ही संस्था महिलांच्या हक्कांबाबत पुढाकार घेऊन जनजागृती करीत असते. पण सतत सात वर्षे

संघर्ष करुन सुध्दा वर्षानुवर्षे आपण दगडावरच डोके आपटत आहोत असा अनुभव महिलांना आला. त्यांच्या रणनीतीला यश येत नव्हते व समान वेतनाची मागणी धुडकावली जात होती.

महिला गटाच्या अध्यक्षा म्हणतात की शेवटी आम्ही समाजातले जे संवेदनशील पुरुष आहेत त्यांच्यापुढे आमची व्यथा मांडण्याचे ठरविले. फेक येथील जिल्हा रुग्णालयात डॉ. मेरो हे बालरोगतज्ञ म्हणून काम करतात. हे डॉक्टर आमचे प्रवक्ते झाले व त्यांनी आमच्या ग्रामपंचायतीला असे पटवून दिले की जर चिमाझी पंचायतीने महिलांची समान वेतनाची मागणी मान्य केली तर सगळ्या जगापुढे तो एक आदर्श ठरेल.

चिमाझी खेड्यात चाखेसँग जमातीचे लोक राहतात. येथील महिलांना समान वेतनाच्या लढ्यात यश मिळाल्याने त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला असून आदराची वागणूक मिळत आहे. आता नागालँड मधील इतर गावांतल्या महिलांना प्रेरणा मिळाली असून त्यांनी समान वेतनाची मागणी लावून धरली आहे. चिमाझी खेड्यातल्या महिलांना या गोष्टीचा अभिमान आहे, की त्यांच्या श्रमाला समान मूल्य प्राप्त झाले आहे. त्या महिला आपल्या मुला-नातवांना अभिमानाने सांगू शकतात, की आमच्या पिढीने समान वेतनाचा मुद्दा लावून धरला व समान वेतन प्राप्त करुन घेतले.

पण चिमाझी खेड्यातल्या महिलांचा संघर्ष



अद्याप संपलेला नाही. खेड्यातले अनेक पुरुष समान वेतनाची कल्पना मान्य करीत नाहीत व त्यांनी या निर्णयाला आव्हान देण्याचे ठरविले आहे. ग्रामपंचायतीने समान वेतनाचा निर्णय रद्द करावा अशी मागणी अध्यक्षांकडे काही पुरुषांनी गेल्या वर्षी केली होती पण अध्यक्षांनी ती फेटाळून लावली.

महिला गट अध्यक्ष म्हणतात की आम्ही जे साध्य केले आहे ते कदापी आमुच्या हातातून निसटणार नाही. ग्रामपंचायतीचे सध्याचे अध्यक्ष वेलहिटे नारो हे महिलांबद्दल आदर बाळगणारे असून त्यांच्या हक्कांबाबत संवेदनाशील आहेत. दिल्लीच्या कॉलेजातून त्यांनी समाजशास्त्रात पदवी प्राप्त केली असून ग्रामपंचायतीत दोन महिलांना सभासदत्त्व त्यांनी बहाल केले आहे. महिलांची संख्या पंचायतीत वाढविण्याचा त्यांचा विचार आहे. समान वेतन देण्याच्या निर्णयाशी श्री. नारो ठाम असून हा निर्णय कदापी मागे घेणार नाही असा त्यांचा निर्धार आहे. ●


**ईशान्य वार्ता मासिकाचा अंक आता PDF स्वरुपातही उपलब्ध**

सध्याच्या काळात अनेकजणांचे नातेवाईक, विशेषतः युवा वर्ग परदेशात नोकरी किंवा शिक्षणासाठी राहात आहे. या तरुणांचा मराठी भाषेशी संपर्क रहावा, त्याचबरोबर त्यांनाही ईशान्य वार्ता मासिकाद्वारे ईशान्य भारतातील घडामोडी कळाव्यात. तसेच त्यांना तिथे काम करणाऱ्या सेवा भावी संस्थांची माहिती झाली तर आपल्या समाजासाठी काही करण्याची जाणीव त्यांच्यात निर्माण होईल. या हेतूने त्यांना ईशान्य वार्ताचा अंक PDF स्वरुपात आपल्याला पाठवता येईल. ज्यांना अंक पाठवायचा असेल त्या संबंधीत व्यक्तीची  ई-मेल कळवणे आवश्यक आहे. या अंकाची वार्षिक वर्गणी रु. २५०/- आहे.

# इसरो : साधी माणसं, अफाट कर्तृत्व

- सारंग लेले, आगाशी ९८२०१००५४१

आज दिनांक २२ जुलै २०१९ रोजी दुपारी ठरलेल्या वेळी म्हणजे २ वाजून ४३ मिनिटांनी इसरोचं चांद्रयान २ आकाशात झेपावलं. १५ जुलैच्या रात्री आढळलेला तांत्रिक बिघाड दुरुस्त करुन आजच्या दिवशी चांद्रयानाने उड्डाण घेतल्यावर प्रत्यक्षात आणि टिव्हीकडे डोळे लावून बसलेल्या अनेक भारतीयांनी सुटकेचा श्वास टाकला असेल. उड्डाणाच्या आधी काउन्टडाउनच्या वेळी जाणवणारी धडधड उड्डाण झाल्यावर सामान्य नागरीकांसाठी थांबली असली तरी पुढचे ४८ दिवस चांद्रयान २ चंद्रावर पोहोचेपर्यंत आणि त्यानंतर १५ दिवस अपेक्षित निरीक्षणं हाती येईपर्यंतचा काळ इसरोच्या शास्त्रज्ञांसाठी कसोटीचा असणार आहे. इसरो म्हणजे इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन. अवकाश संशोधन क्षेत्रातील जागतिक पातळीवरील महत्त्वपूर्ण संशोधन संस्था.

सव्वातीन लाख किलोमीटरपेक्षा जास्त अंतरावर जराही माहिती नसलेल्या "टोटल ब्लाइंड स्पॉट" असलेल्या चंद्राच्या दक्षिण भागात चांद्रयान २ नेऊन उतरवणे, हे आपल्यासारख्या सामान्य माणसांच्या बुध्दीच्या पलीकडचं आहे. वेगवेगळ्या प्रकारची गणितं करुन कमीतकमी इंधन वापरत चंद्राच्या कक्षेत एखादं यान स्थिर करणं आणि नंतर त्याद्वारे माहिती मिळवणं, हे आपल्यासाठी अगम्य आहे. बरं गम्मत म्हणजे हे सगळं हाताळणारी इसरोच्या नियंत्रण कक्षातली माणसं ही आपल्याबरोबर टपरीवर चहा पिणाऱ्या माणसांच्या इतकीच साधी दिसत होती. त्यातल्या अनेकांच्या कपाळावर गंध होतं. त्यांची बुध्दी, त्यांचं अफाट काम, त्यांचा आधुनिक विज्ञानाचा मार्ग ह्याच्यात त्यांची श्रध्दा अडसर ठरत नसावी, असा माझा कयास आहे.

■ ■ ■

**अंतराळ मोहिमेपेक्षा जास्त काम इसरो इतर उपग्रहांवर करतेय. कारण ती आपल्या देशाची गरज आहे. इसरोच्या उपग्रहांनी दिलेली हवामानाची माहिती आणि सुरक्षेसाठीची पडताळणी ही दोन महत्त्वाची कामं गेल्या काही महिन्यात भारताला अत्यंत उपयोगी पडली आहेत.**

■ ■ ■

ह्या सर्व शास्त्रज्ञांमध्ये कैलासवदीवु अर्थात के सिवन हे एव्हाना सर्वांना परिचित इसरोचे प्रमुखही होते. सिवन हे अत्यंत गरीब आणि साध्या कुटुंबातून आलेले आहेत. त्यांचे वडील फक्त एकरभर जागेत भातशेती करत. तामिळ मिडीयममधून शिक्षण पूर्ण केलेल्या सिवन ह्यांनी गणितात बीएस्सी केलं. नंतर मद्रास इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधून एरोनॉटिकल इंजिनीयरींग आणि पुढे त्याच विषयात आयआयएससीसीतुन मास्टर्स केलं. २००६ साली त्यांनी आयआयटी मुंबईतून आपली पीएचडी पूर्ण केलीय. १९८२ साली सिवन इसरोत रुजू झालेत.

उड्डाणाच्या आधी चेहऱ्यावर ना काळजी ना भीती आणि पहिल्या महत्त्वाच्या पायऱ्या पूर्ण झाल्यवर ना जल्लोष, ना हर्षोल्लास. परिपूर्ण परिपक्व आणि विद्वत्तापूर्ण स्थितप्रज्ञता श्री सिवन ह्यांच्यासकट इसरोच्या नियंत्रण कक्षात इतर सर्वांच्या देहबोलीतून दिसत होती.

अमेरिकेच्या नासाप्रमाणेच इसरो ही जगातली एक अत्यंत प्रगत अंतराळ संस्था आहे. विकिपीडियाच्या माहितीनुसार इसरोत आजमितीला १६,८१५ लोक काम करतात. ही संख्या नासाच्या जवळपास आहे. मात्र इसरोला भारत सरकारकडून

मिळणारा निधी १२ हजार चारशे कोटी रुपये आहे तर अमेरिकन सरकार नासाला १.४ लाख कोटी रुपये पुरवते. दोन्ही संस्थांमधला हा एक मोठा फरक आहे. कमीतकमी पैशात यशस्वी मोहिमा राबवणं ही इसरोची खासियत म्हणायला हवी. मंगलयान मोहिमेचा एकूण खर्च होता ४०० कोटी रुपये जो हॉलिवूडच्या अनेक चित्रपटांपेक्षा कमी होता.

चांद्रयान २ चं बजेट आहे ९७८ कोटी रुपये. म्हणजेच फक्त बाहुबली २ च्या कमाईमध्ये दोन चांद्रयान मोहिमा होऊ शकतील आणि बीसीसीआयला आयपीएलच्या लिलावातून मिळालेल्या पैशातून तब्बल सोळा चांद्रयान मोहिमा होऊ शकतील. इसरो किती कमी पैशात सगळं भागवते ते कळावं (आणि भारतीय लोक आपला पैसा कुठे ओतत असतात हेही कळावं) ह्यासाठी हे आकडे. त्यामुळे मिळणाऱ्या निधीचा वापर करुन इसरोने केलेली वाटचाल ही नक्कीच अभिमानास्पद आहे.



चांद्रयान २ ही भारतासाठी जशी एक मोठी मोहीम आहे, त्याचप्रमाणे इसरोची पुढच्या वर्षीची सुर्यावरची मोहीम ही देखील महत्त्वाची असणार आहे. त्यासाठी इसरो "आदित्य - एल १" ह्या यानावर काम करते आहे. हे यान पृथ्वीपासून १५ लाख किलोमीटर अंतरावर स्थिरावून आपली निरीक्षणं इसरोकडे पाठवेल. सर्व जगभरातला सूर्य मोहिमेचा हा प्रमुख प्रयत्न असणार आहे.

मागील वर्षी १५ ऑगस्टला पंतप्रधान मोदींनी भारताच्या पहिल्या मानवी मोहिमेची घोषणा केली होती. "गगनयान" ह्या नावाची ही मोहीम २०२२ पर्यंत अपेक्षित आहे. त्याचबरोबर शुक्र ग्रहाचा अभ्यास करण्यासाठी "शुक्रयान" ही मोहीमसुध्दा प्रस्तावित आहे.

अंतराळ मोहिमेपेक्षा जास्त काम इसरो इतर उपग्रहांवर करतेय. कारण ती आपल्या देशची गरज आहे. इसरोच्या उपग्रहांनी दिलेली हवामानाची माहिती आणि सुरक्षेसाठीची पडताळणी ही दोन महत्त्वाची कामं गेल्या काही महिन्यात भारताला अत्यंत उपयोगी पडली आहेत.

स्कॅटसॅट १, ओशनसॅट - २ आणि पोलार ऑरबीटिंग मिनिएचर सॅटेलाईट ह्यांनी मे महिन्यात ओरिसाच्या किनाऱ्यावर आलेल्या फणी वादळाच्या वेळी दर पंधरा मिनिटाला अचूक माहिती पुरवली होती. त्या माहितीच्या आधारे साडेअकरा लाख लोकांचे सुरक्षित स्थलांतर करुन मोठी जिवीतहानी टाळण्यात यंत्रणांना यश मिळालं होतं.

ह्या व्यतिरिक्त कोरसॅट - १ आणि कोरसॅट - २ हे दोन अत्यंत महत्त्वाचे उपग्रह भारताकडे आहेत. ह्यातला कोरसॅट -२ हा उपग्रह साधारण दीडेक तासात पृथ्वीप्रदक्षिणा करतो. ६५ सेंटीमीटर इतकं कमी त्याचे रेझोल्युशन आहे. (चीनच्या उपग्रहाची क्षमता ५ मीटर इतकी आहे) अगदी पाकिस्तानी सैन्याच्या मुख्यालयात किती गाड्या आहेत हेही हा उपग्रह टिपू शकतो. पाकव्याप्त कश्मिरमध्ये केलेल्या सर्जिकल स्ट्राईकमध्ये ह्या उपग्रहाची फार मोठी मदत भारतीय सैन्याला झाली होती.

सायकलवरुन सामान वाहून नेण्यापासून ते सूर्यचंद्रांना गवसणी घालण्यापर्यंत इसरोचा प्रवास प्रत्येक भारतीयासाठी अभिमानास्पद आहे. अंतराळ आणि अवकाशाच्या संशोधनात भारताची परंपरा फार गौरवशाली आहे. इसरोच्या यशाने ती उत्तरोत्तर उजळत जावो. ●

# महिलांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या पॅड-वुमन : डॉ. प्रतिभा आठवले

-डॉ. स्वाती गाडगीळ, ९८२०१००५४१

"ती झाली" हे वाक्य "ती" च्या आयुष्यातील किती महत्त्वाचं वाक्य असतं! मेनार्की म्हणजे मासिक पाळी सुरु होणं आणि मेनोपॉज म्हणजे मासिक पाळी जाणं. पाळी सुरु झाल्यावर सुरुवातीचे काही महिने मुलींना त्याची सवय होईपर्यंत कष्टाचे वाटतात. आपण म्हणतो की मुलींना नऊ दहा वर्षांच्या झाल्या की मासिक पाळी विषयी आईने किंवा शाळेतील बाईंनी माहिती द्यावी. काय घडतं, का घडतं, कशी काळजी घ्यावी, कशी स्वच्छता राखावी आणि काय खबरदारी घ्यावी! किती पैलू सांगावे, कसे सांगोव याचा संकोच करु नये. यासाठी डॉ. प्रतिभा आठवले पुढे सरसावल्या आणि ईशान्य भारतातील आईचं काम हलकं झालं

पॅडमॅन सिनेमा आल्यावर आणि टिव्ही वर येणाऱ्या जाहिरातींमुळे समाजात एक जागरुकता निर्माण झाली आहे. पॅडमॅन सारखं यांना पॅडवूमन म्हटलं तर अयोग्य ठरणार नाही. गेली १९ वर्षे सातत्याने ईशान्येतील डोंगराळ व पहाडी भागात जाऊन विनामूल्य दंतचिकित्सा करणाऱ्या प्रतिभाताईंना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली आणि ती म्हणजे मुलींना पाळीच्या काळात सॅनिटरी नॅपकिन्स वापरणं परवडत नाही म्हणून त्या कपड्याच्या घड्याच वापरतात.

मग त्यांच्या मनात आलं, का नाही त्या मुलींना व महिलांना स्वतःच सॅनिटरी नॅपकीन बनवायला शिकवावे, जेणेकरुन एका लघूउद्योगाची देखील सुरुवात होईल आणि शारीरिक आरोग्याची निगा राखली जाईल. मनात विचार आला आणि तो तडीस नेला. एक सूटकेस मॉडेल तयार झालं. एका युनिटमध्ये मोल्ड, पॅकबंद, निर्जंतुकीकरण आणि

▪ ▪ ▪

**१५ एप्रिल २०१९ ला पहिले मॉडेल कश्मिर येथे बसविण्यात आले. सेवा भारती या संस्थेशी अनेक वर्ष त्या संलग्न आहेत. त्या संस्थेच्या मार्फत या मशीनची विक्री होते. मुलींची सुधारगृहे, अनाथालये, अंधमुलींची वसतिगृहे, अपंगालये, शाळा व हॉटेल्समध्ये हे मशीन फार उपयोगी ठरेल. अशा नाजूक विषयांबद्दल सामाजिक भान जपण्याचं काम खरं तर प्रत्येक स्त्रीने स्वतःची जबाबदारी मानली पाहिजे. प्रत्येक मातेने आपल्या लेकीला स्वच्छतेचे धडे दिले पाहिजेत.**

▪ ▪ ▪

शेवटी वापरलेले पॅड जाळून टाकण्यासाठी सरल भट्टी आहे. एक मशीन ज्यात नॉनवूवन फॅब्रिक, जेल शीट आणि प्लास्टिकचा एक कागद एकत्र दाबून त्याला कॉम्प्रेस केलं जातं. एका सूटकेसमध्ये मावणाऱ्या ह्या मशीनची किंमत ६००० रुपये आहे. त्यातच नॅपकीन जाळण्याची पण सोय आहे. अशा प्रकारे बनवलेल्या नॅपकीनची किंमत खूपच कमी पडते. एका तासाला या मशीन मध्ये ३० ते ४० पॅड तयार करता येतात. नक्कीच परवडण्यासारखं आहे. दुर्गम भागातील मुलींच्या व महिलांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी प्रतिभाताईंनी उचललेलं एक पाऊल खरं तर ऐक मोठी झेप आहे.

१५ एप्रिल २०१९ ला पहिले मॉडेल कश्मिर येथे बसविण्यात आले. सेवा भारती या संस्थेशी अनेक वर्ष त्या संलग्न आहेत. त्या संस्थेच्या मार्फत या मशीनची विक्री होते. मुलींची सुधारगृहे,

अनाथालये, अंधमुलींची वसतिगृहे, अपंगालये, शाळा व हॉटेल्समध्ये हे मशीन फार उपयोगी ठरेल. अशा नाजूक विषयांबद्दल सामाजिक भान जपण्याचं काम खरं तर प्रत्येक स्त्रीने स्वत:ची जबाबदारी मानली पाहिजे. प्रत्येक मातेने आपल्या लेकीला स्वच्छतेचे धडे दिले पाहिजेत. जुन्या रुढी परंपरांच्या जाळ्यातून सोडवलं पाहिजे. आज जग किती पुढे चाललं आहे आणि आपण मागे तर नाही ना याचं प्रत्येकीला भान असणं आवश्यक आहे.

सूटकेस मॉडेलच्या रुपाने सुरु झालेला हा लघुउद्योग नक्कीच त्या दिशेने एक पाऊल आहे. असे परवडणारे नॅपकिन मिळाले, तर आपण त्यांना आवर्जून सांगू शकतो की कपड्याच्या घड्या वापरायच्या नाहीत आणि नॅपकिन किमान दर सहा तासांनी बदलावा. वापरलेला नॅपकिन इकडे तिकडे न टाकता त्याच मशीनमध्ये जाळून टाकावा. मेन्सट्रुअल हायजीन हा खूप महत्त्वाचा विषय आहे. या मॉडेल बद्दल अधिक माहिती हवी असल्यास **डॉ. प्रतिभाताई आठवले**, अहमदाबाद यांच्याशी ०९४२६३६१४७२ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा. ●

## TRACKING VISAPUR

### "Jai Bhavani Jai Shivaji!"

**Chinchwad boys hostel and Pune girls hostel** fested for visapur. When we reached spot of malavali. We looked up the top of mountain, we all curious, excited and shouted Wow..! OMG..! I looked around the environments full of greenary. It was like my dream that I am in my own native place Nagaland. I felt my lungs inflate with the onrush of scenary air, mountain, grass, tree and river. The sound of flow river, various types of birds and insects singing, I felled some unique, how beauty of nature.

We enjoyed by clicked photos in beauty scenary, danced in waerfall, amused among us an catched one another hands when our path plights came acrossed.

The rain started showered us, the rain drops kissed our face and beated our heads we took the pleasureed of rain showered. We shouted "Bharat Mata ki, Jai" , "Vande Mataram" " Jai Bhavani, Jai Shivaji" People's around started stared us in a good manner and some people's interacted with us.

When we reached top of mountain no words to describes about beauty of nature, I can say it was paradise. Fresh air blowed, greenary of grass, slightly rain showered, dark sky and beautiful whitening transperancy fog around us.

We enjoyed pleasure of whethers swimmed at ponds. hanged out views of beauty natural science from top of mountain, and we returned in a same manner. We satisfied our tracing with harmony and courtesy.

**Kumar Teralia Newmai**
**Chinchwad hostel**

# मणिपूरमधील हातमाग उद्योग

श्रीमती सिधारानी या दिल्ली विश्वविद्यालयातून कायद्याची पदवी मिळविलेल्या मणिपुरी महिला असून त्यांनी वकिली व्यवसाय सोडून मणिपूरमध्ये हातमाग उद्योगाच्या प्रचार-प्रसारासाठी स्वत:ला वाहून घेतले आहे. पत्रकारांशी बोलतांना त्या म्हणाल्या की मणिपूरमध्ये हातमाग उद्योगात विणकाम करणाऱ्यांमध्ये महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. पण त्यातल्या बऱ्याचश्या महिला अशिक्षित आहेत. निरक्षर आहेत. त्यामुळे राज्य सरकारने हातमाग उद्योगासाठी ज्या योजना आखल्या आहेत व जे प्रकल्प सुरु केले आहेत त्यांबद्दल या स्त्रीयांना काहीच माहिती नाही. जो पर्यंत हातमाग उद्योगातल्या खऱ्या खुऱ्या विणकरांना सरकारी सोयी-सवलती इत्यदींचा फायदा होत नाही तो पर्यंत मणिपूर मधल्या हातमाग उद्योगाला भरभराट प्राप्त होणार नाही.

सध्या मणिपूरमध्ये हातमाग उद्योगांची स्थिती चांगली नाही, व दिवसेंदिवस स्थित बिघडतच चालली आहे. जरी या क्षेत्रात राज्य सरकारने कांही प्रकल्पांची आखणी केली असली व जरी ते प्रत्यक्षात येण्याच्या मार्गात असतील तरी हातमाग उद्योग राज्यात टिकून रहावा यासाठी सरकारने उचित व सकारात्मक पाऊले उचलणे आवश्यक आहे. स्थानिक लोकांचे सहकार्य लाभले व त्यांनी जर पाठींबा दिला तरच कोणत्याही उद्योगाचा विस्तार शक्य होतो. जर स्थानिक लोक आपल्याला साथ देण्यासाठी तयार झाले तर बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतील



■ ■ ■

**मणिपूरमध्ये विणकाम करण्यात येणारी वस्त्रं - प्रावरणे अतिशय उत्कृष्ट दर्जाची व अत्यंत सुरेख आणि अभिजात असतात. संपूर्ण भारतात कापडावरच्या हस्तकलेच्या बाबतीत मणिपुरातल्या वस्त्रांचे आगळे-वेगळे स्थान आहे व त्यांच्या या अभिजात कलेबद्दल ही वस्त्रं फार प्रसिध्द आहेत. येथे या कुटीर उद्योगात महिलांना मोठ्या प्रमाणांत नोकरी-व्यवसायाची संधी प्राप्त होते.**

■ ■ ■

व त्यामुळे आपल्या मणिपूर राज्याची आर्थिक स्थिती सुधारु शकेल.

श्रीमती सिधारानी म्हणतात, की माझ्या स्वत:च्या हातमाग उद्योगातून मला वर्षाला सुमारे ४.५० लाख रुपये नफा प्राप्त होतो. मणिपूरातल्या मितेई समाजातल्या स्त्रीया सणा-समारंभाच्या प्रसंगात पारंपारिक वेशभूषा करतात. या वेशभूषेचे डिझाईन करण्याची हस्तकला व कसब सिधारानी यांच्याकडे आहे.

श्रीमती सिधारानी म्हणतात की हातमागावर विणकाम करण्याचे कौशल्य त्यांना त्यांच्या आईने शिकविले आहे. सन २०१५पासूनवेगवेगळी प्रदर्शने आणि राज्यतले अनेक प्रकल्प यांच्या माध्यमातून त्यांनी हस्तकलेचा प्रचार-प्रसार केला आहे.

मणिपूरात स्वबळावर कांही महिलांनी इ-याँग सांगबानाबी नांवाचा एक गट स्थापन केला

आह. सुमारे ३० महिलांनी या गटाच्या माध्यमातून पारंपारिक वस्त्र विणण्याचा व्यवसाय सुरु केला आहे.

श्रीमती सिधारानी म्हणतात की सुमारे १५ महिलांना त्यांनी विणकाम व्यवसाय सरु करण्यासाठी भांडवल उपलब्ध करुन दिले आहे. या महिलांना विणकाम व्यवसाय सुरु करण्यासाठी जो धागा विक घ्यावा लागतो तो विकत घेणे शक्य नव्हते. त्यांनी विणलेल्या वस्त्र-प्रावरणांची विक्री नंतर बाजारात करण्यासाठी त्यांनी मार्गदर्शन केले आहे.

मणिपूरमध्ये विणकाम करण्यात येणारी वस्त्रं - प्रावरणे अतिशय उत्कृष्ट दर्जाची व अत्यंत सुरेख आणि अभिजात असतात. संपूर्ण भारतात कापडावरच्या हस्तकलेच्या बाबतीत मणिपुरातल्या वस्त्रांचे आगळे-वेगळे स्थान आहे व त्यांच्या या अभिजात कलेबद्दल ही वस्त्रं फार प्रसिध्द आहेत. येथे या कुटीर उद्योगात महिलांना मोठ्या प्रमाणांत नोकरी-व्यवसायाची संधी प्राप्त होते. मणिपुरी महिलांसाठी हात मागावर विणकाम करण्याचे कौशल्य म्हणजे केवळ एक मान सन्मानाची बाबच नाही तर त्यांच्या सामाजिक -आर्थिक जीवनाचा तो एक अपरीहार्य पैलू आहे. ●

---

## दोन नागा चित्रपटांचे जागतिक पातळीवर प्रदर्शन

- प्रतिनिधी

स्थानिक भाषेतील, स्थानिक जीवनशैलीवर आधारित चित्रपटांनी स्वत:चे एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. अगदी विकसनशिल देशही यात मागे नाहीत. भारतीय चित्रपटांनी तर यात फार मोठे स्थान मिळवले आहे. दक्षिण भारतीय चित्रपट, महितीपट असोत की मराठी असमिय, त्यांनी उत्तम कथानककावर आधारित दर्जेदार चित्रपट निर्माण केले आहेत. याच शृंखलेत बसतील असे दोन नागा चित्रपट रेनफॉरेस्ट फ्रिज इंटरनॅशनल इंडोजिनिअस फिल्म फेस्टिवल २०१९ या चित्रपट महोत्सवात प्रदर्शित झाले आहेत. पहिल्या चित्रपटाचे नांव **स्ट्रेन्थ इन डायव्हर्सिटी** (वैविध्यातील उत्कृष्टता) आणि दुसऱ्या चित्रपटाचे (माहितीपटाचे) नांव "शॉट अवेक" यामधे नागा पारंपारिक लाकडी ढोलाची माहिती करुन देण्यात आली आहे. ७ जुलैपासून सुरु झालेला हा महोत्सव १२ जुलै पर्यंत इंडोनेशीयात सुरु राहणार आहे.

"स्ट्रेन्थ इन डायर्व्हसिटीमधे नागा खेड्यातील वैविध्यपूर्ण खाद्यजीवनावर प्रकाशझोत टाकण्यात आला आहे तर शूट अवेक मधे कोन्याक खेड्यातील चांगलांगशू येथील गावकरी लाकडी ढोल कसा तयार करतात ते दाखववण्यात आलेआहे. नागालँडचे प्रतिनिधित्व करणाऱ्या श्रीमती अनुंगला लाँगकुमरे म्हणाल्या की झाडाचा बुंधा तोडल्यापासून खोडातून कोरिवकाम करुन ढोल तयार करणे व तो गावापर्यंत खेचून आणणे हा सर्व भाग उत्कृष्टणपणे चित्रित झाला आहे. २५ मिनिटांच्या यामाहितीपटात अनेक छायाचित्रे, ज्येष्ठ व्यक्तींकडून मिळालेली माहिती यामूधन विस्मरणात गेलेले हे वाद्य पुन्हा एकदा जिवंत झाल्याचा अनुभव आला.

स्थानिक जीवनशैलीवर आधारित चित्रपटमहोत्सव म्हणजे विविध वेदनादायी आणि आनंदी कथांनी एकत्र आलेले जणू एक कुटुंब म्हणावे लागेल. अनुंगला म्हणाल्या की आजच्या नागा युवकांनी नागा परंपरेशी स्वत:ला जोडून घ्यायला हवे; अन्य देशातील फॅशन आणि परंपरा यांच्या आहारी जाण्यापेक्षा स्वत्व जपायला हवे. अशा प्रकारचा जागतिक चित्रपट महोत्सव भविष्यात नागालँडमध्ये अयोजित झाला तर त्यातून फार मोठा उत्साह निर्माण होईल.

# नागालँडचे मित्र : राज्यपाल पद्मनाभ आचार्य

**पुरुषोत्तम रानडे, ९९६९०३८७५९**

"The ongoing talks for permanent peace are yielding positive results. The talks have become more purposeful, less ritualistic, more forthright and far more frequent. This shall bring peace and happiness for all nagas"

१५ ऑगस्ट २०१७ च्या स्वातंत्र्यदिनी नागा समाजाला उद्देशून केलेल्या भाषणात राज्यपाल मा. श्री. पद्मनाभजी आचार्य यांनी वरील उद्‌गार काढले होते. खरं तर हे भाषण नव्हतं तो नागा जनतेशी अतिव जिव्हाळ्याने साधलेला संवाद होता. अनेक दशकं संघर्षमय स्थितीत जगत असलेल्या नागा समाजाला या पुढेतरी शांतातमय, आनंदी जिवन जगायला मिळावं ही त्यांची मनस्वी इच्छा आहे.

१९६० च्या दशकात पद्मनाभजींनी प्रथमच अरुणाचलात (तेव्हाचा नेफा) पाऊल ठेवलं. त्याला ही आता सुमारे ६० वर्षे झाली आहेत. तरुण वयातील या पूर्वांचल दर्शनाने पद्मनाभजी इतके भारावून गेले की पुढील काळात संपूर्ण पूर्वांचलाशी त्यांचं आत्मीय नात निर्माण झालं. या नात्यातून च **स्टुडंटस् एक्सपिरीअन्स इन इंटरस्टेट लिव्हिंग** या उपक्रमाचा जन्म झाला आणि त्यातून अनेक कार्यकर्ते पूर्वांचलाशी जोडले गेले.

परंतु मा. पद्मनाभजी रमले ते मात्र नागा समाजात. जेव्हा नागालँड राज्यही अस्तीत्वात नव्हतं, तेव्हा नागाहिल्स आणि राणी गाईदिन्ल्यू यांच्याशी त्यांचं जिव्हाळ्याच नातं निर्माण झालं. नागा समाजावरच्या अपरंपार प्रेमापोटीच जणू नियतीने त्यांना नागालँडचे राज्यपाल बनवलं. आणि नागा समाजाबद्दलच्या आत्मीय नात्याला एक नवं परिमाण मिळालं.

इंडियन नॅशनल फेलोशिप सेंटरच्या माध्यमातून त्यांचं पूर्वांचलाशी संबंधित काम सुरु होतंच, ते अधिक गतीमान झालं. नागा समाज

■ ■ ■

**नागा समाजावर त्यांच्या इतक अकृत्रिम प्रेम करणारी व्यक्ती सापडणं विरळच आहे. नागा समाजानेही त्यांना वडिलकीचा मान देत त्यांच्यावर प्रेम केलं आज राज्यपाल पदावरुन निवृत्त होतांना तेथील राज्यकिय पक्षातील व्यक्तींना आणि समाजाला वियोगाचे दुःख जाणवतं असेल. परंतु असं असलं तरी इंडियन नॅशनल फेलोशिपच्या माध्यमातून नागालँडशी जोडलेले ऋणानुबंध कायमच वृध्दिंगत होत राहतील.**

■ ■ ■

आणि स्वतः आपण या मधील भावनीक नातं अधिक सुद्धढ व्हावं म्हणून त्यांनी राजभवनाची दारं सताड उघडली. आणि राजभवनाच लोकभवन झालं. पद्मनाभजींच्या कार्यकाळात भारतातून विशेषतः महाराष्ट्रातून किती सेवाभावी संस्था नागालँडमधील जनतेच्या सेवेसाठी तिथे गेल्या, नागालँडच्या आर्थिक प्रगतीसाठी किती जणांना आणि संस्थांना त्यांनी प्रेरणा दिली, किती स्थानिक कलाकार, क्रीडापटू, बुध्दीजीवी यांना नागालँडच्या विकासासाठी कार्यरत केले ह्याची नोंद करायची झाली तर त्यासाठी वर्षभर खपून अहवाल तयार करावा लागेल. इतकं त्यांचं प्रचंड योगदान आहे.

पर्यटनाच्या माध्यमातून एकात्मतेची, मैत्रिची व परस्पर विश्वासाची भावना निर्माण होईल यावर त्यांचा विश्वास होता. म्हणूनच महाराष्ट्रातील नागरिकांनी पर्यटनासाठी नागालँडमधील हॉर्नबिल फेस्टीवलला मोठ्या प्रमाणात भेट द्यावी असे अव्हान ते वारंवार करीत असत. परिणामी गेल्या पाच वर्षात पर्यटकांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून आले. ●




**ईशान्य वार्ता मासिकाची राज्यपालांकडून दखल**

ईशान्य वार्ता मासिक आणि महाराष्ट्रातील पूर्वांचल वसतीगृहे हा त्यांचा एक जिव्हाळ्याचा विषय. मुंबईतील नॉर्थ-ईस्ट सेलच्या कार्यक्रमात त्यांची प्रथमच भेट झाली. मी त्यांना ईशान्य वार्ताचा अंक दाखवला आणि माहिती दिली. योगायोगाने त्या अंकाला नागालँडशी संबंधीत मुखपृष्ठ होतं. तिथे उपस्थित असलेले नागालँडचे मुख्यमंत्री श्री. नैफ्यु रिओ यांना त्यांनी मासिकाबाबत माहिती दिली आणि रिओ यांच्या हस्ते ईशान्य वार्ताच्या त्या अंकाचे प्रकाशनही झाले.

पत्रकारिता आणि पर्यटन हा त्यांचा खास जिव्हाळयाचा विषय. ईशान्य भारताशी निगडीत एखाद्ये नियतकालिक सुरु करावं, असं त्यांना त्यांच्या तरुणवयात वाटत असे. म्हणूनच असेल, त्यांनी ईशान्य वार्ताला मदतीचा हात दिला. राज्यपाल म्हणून नियुक्ती झाल्यावर पत्रकारिता आणि पर्यटन या विषयांशी संबंधित मला आणि ईशा टूर्सचे संचालक आत्माराम परब ह्यांना हॉर्नबिल फेस्टीवलच्या निमित्ताने राजभवनावर निमंत्रित केलं. माझ्याकडे निर्देशकरुन "रानड्यांची ओळख करुन घ्या, त्यांनी ईशान्य वार्ता मासिक सुरु करुन एक मोठं काम सुरु केलं आहे. " असे उद्‌गार निमंत्रितांसमोर काढले. ते उद्‌गार म्हणजे जणू त्यांचे आशीर्वाद असंच मी समजतो.

महाराष्ट्रात आल्यावर एकातरी पूर्वांचल वसतीगृहाला भेट देण्यावर त्यांचा कटाक्ष असे. नागासमाजावर इतकं अकृत्रिम प्रेम करणारी व्यक्ती सापडणं विरळच! नागा समाजानेही त्यांना वडिलकीचा मान देत त्यांच्यावर प्रेम केलं. आज राज्यपाल पदावरुन निवृत्त होताना तेथील राजकीय पक्षातील व्यक्तींना आणि नागा समाजालाही वियोगाचे दुःख जाणवले असेल. असं असलं, तरी **इंडियन नॅशनल फेलोशिप सेंटरच्या** माध्यमातून आणि अन्य उपक्रमातून त्यांनी नागालँडशी जोडलेले ऋणानूबंध कायम वृध्दिंगत होत राहतील यात शंकाच नाही. ईशान्य वार्ता मासिकाला यापुढेही त्यांचे आशीर्वाद आणि मार्गदर्शन मिळेल ह्याची खात्री वाटते. या पाच वर्षांच्या काळात माननीय पद्मनाभजींचे सहकारी श्री. दिलीप परांजपे व सुरेशराव साठे ह्यांनी ही ईशान्य वार्ताच्या वाढीसाठी उत्तम सहकार्य केलं. त्याचीही आठवण या प्रसंगी येत आहे. ■

Postal Reg. No. **THC / 151 / 2018-2020** Posted at BPC Kalyan on 1st day of every month.
RNI Reg. No. **MAHMAR / 2012 / 45108** Total No. of Pages 32
**License to Post without Prepayment under WPP License No. NMR/Tech/WPP-13/Thane/2019**

# Friend of Naga People & Ambassador of Nagaland



State govt. of Nagaland orgainsed farewell programme for outgoing Governer of Nagaland Shri Padmanabh Acharya at Kohima on 25 th July. Chief Minister of Nagaland Shri. Naiphu Riao Speaking at the programme said "Governer Acharya would always be the best goodwill Ambassador of Nagaland and the naga people. Acharyaji did not come to Nagaland as a stranger but rather was already a well know figure, as he had been closely associated with the entire north eastern region since the 1960's.

The state has been enriched with his guidance and leadership during his tenure. He came as a friend of Naga people, won their hearts and now leaving a member of the naga family. Acharji open the gates of Raj Bhavan. He always welcomed musicians, artist, students, sportsman, writers including people from weaker sections.

Kohima Raj Bhavan no longer looked like unreachable ivory tower but emerged as a place of belonging for all sections of the people, especially the youth. He always behaved with me as a friend and an elder brother. He had given his best to improve economic conditions of the people by encouraging and facilitating private investors to come forward for industrial growth of Nagaland.

Governer Achara in his speech said that during five years he had a good fellowship with the people of Nagaland, Stating that Nagaland had the potential to become a strong vibrant golden state. Nagaland can be strengthened by Naga's only. Nobody else can do it and they have the potentiality to do that. Acharya also called upon the universities to address the need of the state, stating that university should not only be the centre of Knowledge but should be the centre of development.

(Source : Nagaland Post 26-7-2019)

हे मासिक मुद्रक, प्रकाशक **श्री. जयवंत कोंडविलकर** यांनी **फ्रेंडस् ऑफ नॉर्थईस्ट सोसायटी**, डोंबिवलीकरिता **अक्षर ग्राफिक्स**, एफ-४, श्री पार्श्व इंडस्ट्रियल इस्टेट, व्ही. पी. रोड, डोंबिवली (पूर्व) येथे छापून ९, जय गायत्री सोसायटी, गोपाळ नगर रस्ता क्र १, डोंबिवली (पूर्व) ४२१२०१ येथे प्रकाशित केले